रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक ७९ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## अंबा नदीपात्रात एकजण गेला वाहून



**नागोठणे :** कामानिमित्त वरवठणे बाजूकडे गेलेला नागोठणे मोहल्ल्यातील ५७ वर्षीय अनवर शेख नागोठण्यातील जुन्या पुलावरून पाय घसरून पडल्याने अंबा नदीच्या पात्रात वाहून गेला. ही घटना शनिवारी (दि.२३) सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. नदीच्या पात्रात अनवर शेख यांची शोधमोहीम सुरू असून संध्याकाळपर्यंत त्यांचा तपास लागला नव्हता. व्यवसायाने चालक असलेले अनवर शेख हे साडेदहा वाजण्याच्या सुमारास वरवठणे बाजूकडून अंबा नदीवरील जुन्या पुलावरून नागोठण्यात येत असताना पुलाच्या मधोमध आल्यानंतर अनवर यांचा पाय घसरल्याने ते खाली पान २ वर


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २४ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹





# 1 लाख बाप्पांची होणार प्रतिष्ठापना

## २८९४ पोलिसांचा ताफा तैनात, चाकरमान्यांसाठी १७२ एसटी सज्ज

| प्रमोद जाधव |
| अलिबाग |

बाप्पाच्या आगमनाची उत्कंठा शिगेला पोहचली आहे. गणरायाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी गणेश भक्त सज्ज झाले आहेत. जिल्ह्यात १ लाख २ हजार ४८४ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. यामध्ये २८६ सार्वजनिक व १ लाख २ हजार १९८ घरगुती गणेशमूर्तींचा समावेश आहे.

गणरायाचे आगमन बुधवारी (दि.२७) ऑगस्ट रोजी होणार आहे. गतवर्षीच्या तुलनेने यंदा दहा दिवस अगोदरच गणरायाचे आगमन होणार आहे. गणपती बाप्पा मोरया... असा जयघोष करीत जिल्हामध्ये बाप्पाच्या स्वागताची तयारी जोरात सुरु आहे. वेगवेगळ्या प्रकारचे डेकोरेशन करण्यावर भर देण्यात आला आहे.



जिल्ह्यात गणेशमूर्ती बुकींग झाली असून मुर्ती घरी आणण्याची तयारी सुरु झाली आहे. काहीजण आदल्या दिवशी मंगळवारी तर काहीजण बुधवारी गणेशमूर्ती घरी आणणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने यावर्षी नशा मुक्तीसह बेटी बचाव बेटी पढाव, स्वच्छतेविषयी चलचित्राचे सादरीकरण करणार आहेत. दीड दिवसांपासून पाच, सात व दहा दिवस वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहेत. पारंपरिक भजनांसह जाखडी नृत्यांचे सादरीकरण केले जाणार आहे. वेगवेगळे सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम राबविले जाणार आहेत.

जिल्ह्यामध्ये एक लाख दोन हजार ४८४ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. दीड दिवसाचे २५ हजार ५५१, पाच दिवसांचे एक हजार ३२२, सात दिवसांचे ५६ हजार ४६८ तसेच अकरा दिवसांचे म्हणजे अनंत चतुर्थीचे १८ हजार २११ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात २८९४ पोलिसांचा ताफा असणार आहे. कोणताही पान २ वर

### १,१५० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गणरायाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. परंतु उत्सव साजरा होत असताना काही मंडळी वाद निर्माण करून कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिसांनी कारवाईचे सत्र हाती घेतले आहे. जिल्ह्यातील एक हजार १५० जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे. भारतीय नागरी सुरक्षा अधिनियम अंतर्गत ही कारवाई केली जाणार असल्याची माहिती रायगड पोलिसांकडून देण्यात आली आहे.

### गणेश विसर्जन ठिकाणांवर दृष्टीक्षेप

| | |
|---|---|
| समुद्र - | 52 |
| खाडी - | 105 |
| नदी - | 244 |
| तलाव - | 100 |
| अन्य ठिकाणे - | 94 |
| एकूण - | 595 |

# प्रकल्पाला नाही, प्रदूषणाला विरोध

## सुरेश घरत यांचे सत्ताधाऱ्यांना रोखठोक प्रत्युत्तर

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

महाराष्ट्रातील अन्य जिल्ह्यांचा विचार केला तर त्या जिल्ह्यातील जनतेला विश्वासात घेतलं तर उद्योगांना जमीन मिळू शकते. जेएसडब्ल्यू कंपनीच्या तिसऱ्या विस्ताराबाबत विरोधकांनी केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी नागरिकांच्या आरोग्यालाही वेठीस धरले आहे. सध्या भांडवलदार बोले आणि शासन चाले अशी स्थिती असल्यामुळे सामान्य नागरिकांची परवड होत आहे.

राज्याच्या दृष्टिने हे औद्योगिक प्रकल्प महत्वाचे असले तरी या प्रकल्पांच्या विस्ताराचा परिणाम जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्यावर होणार असेल तर हे भविष्यासाठी निश्चितच धोकादायक ठरणार आहे. त्यामुळे प्रकल्पाला नाही तर प्रदूषणकारी प्रवृत्तीला विरोध आहे, असे रोखठोक प्रत्युत्तर शेकापचे अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी विरोधकांना दिले. त्यापुढे पान २ वर



### प्रदूषणाबाबत तडजोड नाहीच

अलिबागमध्ये आरसीएफ कंपनीचा विस्तार होत आहे. पण कंपनी पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून हा विस्तार योग्य पद्धतीने करीत आहेत. त्या प्रकल्पाचे आम्ही स्वागतच केले. त्यामुळे जेएसडब्ल्यू कंपनीने प्रदूषणाबाबत तडजोड करू नये. १०० टक्के स्थानिकांना कायमस्वरुपी नोकरीत प्राधान्य देण्याबाबत लिखित करार करावा. तालुक्यातील सर्वांकारिता हॉस्पिटल माफक दरात खुले असेल व स्थानिक लोकांना जे थेट कंपनीतील प्रदूषणाच्या कार्यक्षेत्रात येतात, त्यांना पूर्णतः मोफत आरोग्य सेवा द्यावी.

## पीएनपी गणेश महोत्सव २०२५



● पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कुल वेश्वी यांनी शनिवारी (दि.२३) पीएनपी नाट्यगृह चेंढरे येथे गणेश महोत्सवाचे आयोजन केले होते. यामध्ये इको फ्रेंडली गणपती सजावट स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत अनय मढवी आणि ग्रुप यांनी प्रथम क्रमांक पटकावला. पीएनपी शैक्षणिक संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, डान्स कोरिओग्राफर जयेश पाटील, प्रसिद्ध गायिका भूमी कालबेरे, शिल्पकार महेंद्र गावंड, मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी यांच्या हस्ते विजेत्या ग्रुपला गौरविण्यात आले.

(छायाचित्र : अमोल नाईक)










### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ ऑगस्ट

१) श्रीम. लक्ष्मण तुकाराम सारंग कोळीवाडा, अलिबाग, २४-८-१९५०

२) श्री.प्रदीप हरिश्चंद्र भगत आवास, अलिबाग दि.२४-८-१९६२

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# चाकरमानी’ नव्हे तर ‘कोकणवासीय’

## • शासनाचे लवकरच परिपत्रक जाहीर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

कोकणातून मुंबईसह अन्य शहरांत स्थलांतरित झालेल्या नागरिकांना वर्षानुवर्षे ‘चाकरमनी’ संबोधले जात होते. मात्र हा शब्द अवमानकारक असल्याने तो हटवून त्याऐवजी ‘कोकणवासीय’ असा शब्द वापरा, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला दिले. लवकरच याविषयीचे परिपत्रक काढण्यात येणार आहे.

नुकतीच मुंबई-गोवा महामार्गाच्या अनुषंगाने मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीत कोकणवासीयांच्या काही संघटनांनी ‘चाकरमानी’ हा शब्द अपमानकारक वाटत असल्याने सरकारी कागदपत्रे आणि शासकीय कामकाजात त्याऐवजी कोकणवासीय हा शब्द वापरण्याची आग्रही मागणी केली. त्यानुसार उपमुख्यमंत्री पवार यांनी या बैठकीत यापुढे ‘चाकरमानी’ शब्दाऐवजी ‘कोकणवासीय’ म्हणून संबोधण्याबाबतचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाला दिले आहेत. लवकरच शक्य झाले तर गणेशोत्सवापूर्वीच याबाबतचे शासन परिपत्रक काढले जाणार आहे.

विशेषत: शिमगा, गणेशोत्सव, दिवाळी किंवा इतर सणांसाठी हे लोक मोठ्या संख्येने आपल्या गावी परतत असतात. एसटी किंवा रेल्वेने निघणाऱ्या या कोकणवासीयांना रूढ अर्थाने चाकरमानी संबोधले जाते. चाकरमानी हा शब्द ‘चाकर’ (सेवक) आणि ‘मानी’ (मानणारा) यांच्या संयोगातून तयार झाला आहे. यालाच कोकणवासियांच्या काही संघटनांनी आक्षेप घेतला. हा शब्द कमीपणाचा वाटत असल्याने त्यांनी चाकरमानी या शब्दावर हरकत घेतली आहे. त्यांच्या मते हा शब्द कोकणवासीयांच्या मेहनतीला आणि स्वाभिमानाला कमी लेखणारा आहे. त्यामुळे या संघटनांच्या मागणीनुसार महायुती सरकारकडून चाकरमानी शब्दाऐवजी कोकणवासीयांच्या स्वाभिमानाला आणि सांस्कृतिक ओळखीला अधिक सन्मान देण्यासाठी ‘कोकणवासीय’ हा शब्द वापरण्याचा प्रस्ताव पुढे आला.

### काही संघटनांचा आक्षेप

अनेक दशकांपासून कोकणातील रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर या जिल्ह्यांतील नागरिक कामाच्या, नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये राहून उदरनिर्वाह करतात. त्यामुळे ‘चाकरमानी’ हा मराठी शब्द प्रामुख्याने कोकणातून शहरांमध्ये नोकरी किंवा व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतरित झालेल्या नागरिकांसाठी रूढ झाला.

# स्वराज्य ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेत करोडो रुपयांची अफरातफर

### ●चेअरमन, सचिव यांना अटक

### ● दोन्ही आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

ज्या विश्वासाने ठेवीदारांनी आपल्या कष्टाची कमाई ठेवण्यास दिली त्याच विश्वासाला मोठा तडा लावण्याचा पराक्रम करणाऱ्या नागोठण्याजवळील शेतजुई येथील स्वराज्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन प्रणयकुमार हिंदुराव सावंत व सचिव संजीवन विनायक पाटील या दोघांना पतसंस्थेतील सुमारे ३ कोटी, ८३ लाख, ५१,२६१ एवढ्या मोठ्या रकमेची अफरातफर केल्याप्रकरणी नागोठणे पोलिसांनी अटक केली आहे. रकमेचा अपहार केल्याचा हा गुन्हा २८ मार्च, २०१२ ते ८ डिसेंबर, २०२२ दरम्यान घडला.

या प्रकरणातील दोन्ही आरोपींविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात २२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी साडेसात वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही आरोपींना शनिवारी (दि.२३) सकाळी अलिबाग येथील सत्र न्यायालयात हजर केले असता त्यांना २६ ऑगस्ट पर्यंत चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

कर्जत येथील सहकारी संस्थांचे लेखापरीक्षक श्रेणी २ चे अधिकारी अंकुश शिंदे यांच्या फिर्यादीनुसार नागोठणे पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

यासंदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार नागोठण्याजवळील शेतजुई येथे स्वराज्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची स्थापना केल्यानंतर आरोपी प्रणयकुमार सावंत संस्थापक चेअरमन म्हणून तर दुसरा आरोपी संजीवन पाटील सचिव म्हणून कार्यरत होते. ही पतसंस्था रिलायन्स निवासी संकुलाच्या जवळच असल्याने आणि दोन्ही आरोपी हे त्यावेळी रिलायन्स कंपनीचे कर्मचारी असल्याने ते रिलायन्स कॉलनी मध्येच राहण्यास होते. रिलायन्स कॉलनीत राहणारे कंपनीतील आपल्या इतर सहकाऱ्यांचा विश्वास या दोघांनी संपादन केला. त्यानंतर या दोन्ही आरोपींनी सुमारे दहा वर्षाच्या काळात ५७६ ठेवीदारांकडून सुमारे ३ कोटी, ८३ लाख, ५१,२६१ एवढी मोठी रक्कम ठेवींच्या स्वरूपात जमा केली. मात्र या रकमेचा योग्य हिशोब या दोन्ही आरोपींनी ठेवला नाही. त्यामुळे सर्व ठेवीदारांना त्यांची ठेवींची रक्कम परत देण्यास हे दोन्ही आरोपी टाळाटाळ करू लागले. तसेच ठेवींची रक्कम परत न करण्याबरोबरच पतसंस्थेतील डे बुक, सब डे बुक व कॅश बुकमध्ये खोटा हिशोब तयार करून बनावट अभिलेख तयार केले. सर्व ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपींना नागोठणे पोलिसांनी जेरबंद केले. तसेच कोर्टाने आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी दिल्याने पोलिसांच्या तपासात अजून काही धक्कादायक गोष्टी समोर येण्याची शक्यता आहे.

### लालबागचा राजाच्या दर्शनासाठी मोफत बससेवा

**महाड :** हृदय आणि भक्तीभावाचा महासागर म्हणजेच लालबागचा राजाचे यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर, महाड तालुक्यातील शिरगांवचे सरपंच सोमनाथ ओझर्डे यांनी विन्हेरे - करंजाडी जिल्हा परिषद मतदारसंघातील गणेशभक्तांसाठी लालबागचा राजा दर्शनासाठी मोफत बससेवेचे आयोजन करण्यात आले आहे. ही एकदिवसीय सेवा ४ सप्टेंबर रोजी उपलब्ध होणार आहे. सकाळी शिरगांव नाका येथून बस प्रस्थान करेल. लालबागचा राजाचे दर्शन घेऊन पुन्हा शिरगांव नाका येथे परत येईल. श्रद्धाळूंनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पेणमधील गणेशमूर्तीकारांची समन्वय बैठक संपन्न

**। पेण । प्रतिनिधी ।**



गणेशमूर्तींचे माहेरघर म्हणून समजल्या जाणाऱ्या पेण तालुक्यातील गणेश मूर्तिकारांची समन्वय बैठक पेण नगरपालिकेच्या सभागृहात कोकण परिक्षेत्र पोलिस महानिरीक्षक संजय दराडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली.

यावेळी गणेशमूर्तीकारांना मार्गदर्शन करताना संजय दराडे यांनी गणेशमूर्तीकारांनी जी मूर्ती ट्रान्सपोर्ट करतानाची समस्या मांडली आहे त्यात पोलिस प्रशासन नक्कीच सहकार्याची भूमिका बजावणार आहे असे सांगितले.

यावेळी रायगड पोलिस अधीक्षक आचल दलाल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजित फडतरे, विभागीय पोलिस अधीक्षक जालिंदर नालकुल, पोलिस निरीक्षक संदीप बागुल, पोलिस निरीक्षक प्रसाद पांढरे, पोलिस निरीक्षक संजयकुमार ब्राम्हणे, पेणमधील गणेश मुर्तिकार, शांतता कमिटी सदस्य आणि पेणमधील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

पेणमध्ये हजारो गणेशमूर्तिकार असल्याने त्या मूर्तिकारांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आज कोकण परिक्षेत्र पोलिस महानिरीक्षक संजय दराडे पेण येथे आले होते. यावेळी कारखानदारांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर त्यांना मार्गदर्शन करताना बाप्पाच्या मूर्ती पेणमधून इतरत्र दळणवळणाच्या माध्यमातून नेताना आपल्या गाडीला गणपतीची गाडी असल्याचा स्टिकर लावा, जेणेकरून आमच्या कर्मचाऱ्यांना ती गणपतीची गाडी आहे असे समजेल आणि त्यांना सहकार्य करता येईल, त्याचप्रमाणे इतर व्यापाऱ्यांना देखील ट्रास्पोर्टच्या बाबतीत अडचण होणार नाही यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार असे सांगितले.

# अकरावीच्या प्रवेशापासून १ लाख ९३ हजार विद्यार्थी वंचित

## • उर्वरित विद्यार्थ्यांना अखेरची संधी • २६ ते ३० ऑगस्टदरम्यान होणार शेवटची फेरी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या ओपन टू ऑल विशेष फेरी अंतर्गत प्रवेशाची संधी मिळालेल्या ८५ हजार १०१ विद्यार्थ्यांपैकी ७८ हजार ६५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. त्यामुळे राज्यभरामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १२ लाख ७८ हजार ४४ इतकी झाली आहे, मात्र नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी १ लाख ९३ हजार ७०३ विद्यार्थी अद्यापही प्रवेशापासून वंचित आहेत. या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आता अखेरची प्रवेश फेरी २६ ते ३० ऑगस्टदरम्यान राबविण्यात येणार आहे. अंतिम फेरीचे वेळापत्रक https://mahafyjcadmissions.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे.

अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या नियमित चार फेऱ्या त्यानंतर ओपन टू ऑल फेरी अंतर्गत दोन फेऱ्या राबविण्यात आल्या. अकरावी प्रवेशासाठी नोंदणी केलेल्या १४ लाख ७१ हजार ७४७ विद्यार्थ्यांपैकी १२ लाख ७८ हजार ४४ विद्यार्थ्यांनी या फेऱ्यांमधून प्रवेश घेतले आहेत. यामध्ये मुंबई विभागातून सर्वाधिक २ लाख ८५ हजार ४०० विद्यार्थांनी प्रवेश घेतले. त्याखालोखाल पुणे विभागातून २ लाख २५ हजार ४६१, छत्रपती संभाजी नगर विभागातून १ लाख ५८ हजार १८९, नाशिक विभागातून १ लाख ४२ हजार ६८८, नागपूर विभागातून १ लाख ३२ हजार २४१, कोल्हापूर विभागातून १ लाख २९ हजार ४८६, अमरावती विभागातून १ लाख २४ हजार ७६७ आणि लातूर विभागातून ७९ हजार ४५४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. ओपन टू ऑल फेरीच्या विशेष फेरीमध्ये ७८ हजार ६५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये ७४ हजार ४४० विद्यार्थ्यांनी नियमित फेरीद्वारे तर ४ हजार २१७ विद्यार्थ्यांनी कोट्याद्वारे प्रवेश निश्चित केले. मुंबई विभागातून झालेल्या एकूण २ लाख ८५ हजार ४०० विद्यार्थांच्या प्रवेशापैकी मुंबई शहर व उपनगरातून १ लाख २७ हजार ५३४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. त्याखालोखाल ठाणे जिल्ह्यातून ९३ हजार ७१२, पालघर जिल्ह्यामधून ३४ हजार ९४८ आणि रायगड जिल्ह्यातून २९ हजार २०६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. ओपन टू ऑल अंतर्गत विशेष फेरीमध्ये मुंबई विभागातून सर्वाधिक २४ हजार २४१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

### प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना अखेरची संधी

ओपन टू ऑल विशेष फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागा २५ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहेत. त्यानंतर २६ आणि २७ ऑगस्ट दरम्यान विद्यार्थ्यांना नव्याने नोंदणी तसेच प्राधान्यक्रम यादीत बदल करता येणार आहे. २९ ऑगस्ट रोजी अंतिम विशेष फेरीसाठी गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. यामध्ये प्रवेशाची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांना २९ आणि ३० ऑगस्ट दरम्यान प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन प्रवेश घ्यायचा आहे.

# ...अन्यथा खड्ड्यांमध्ये करणार वृक्षारोपण

**। पाली । वार्ताहर ।**



पाली, अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर मोठाले खड्डे पडले आहेत. जणूकाही चंद्रावरील खड्डे अवतरले आहेत असेच वाटत आहे. पुढील आठवड्यात गणेश उत्सव आहे. त्यामुळे बाप्पाच्या आगमनापूर्वी हे खड्डे भरा अन्यथा खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करू असा इशारा शिवसेनेने (उबाठा) दिला आहे.

या निवेदनात नमूद केले आहे की २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर रोजी गणपती बाप्पाचे आगमन होणार आहे. दरवर्षी मुंबई, ठाणे व पुणे येथीलचाकरमानीगणपतीसणासाठी पाली व सुधागड तालुक्यातील खेडोपाड्यात येतात. तसेच पाली शहर हे अष्टविनायक तीर्थक्षेत्र आहे. मात्र पाली शहरातील खड्डे येथे येणारे भाविक व नागरिकांना डोकेदुखी ठरत आहेत.

शहरातील जुने पोलिस स्टेशन ते गणपती मंदिर हाटाळेश्वर चौक ते विक्रम स्टँड तसेच पालीतील अनेक ठिकाणच्या इतर रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य उभे राहिले आहे. खड्डे व खराब रस्त्यांमुळे गणेश मूर्ती आगमन व विसर्जन करणे नागरिकांकरिता त्रासदायक ठरणार आहे. तसेच रस्त्यांवर बेसमार खड्डे असून खड्ड्यात आदळून दुचाकीस्वार गंभीर स्वरूपात जखमी झालेले आहेत. कित्येक वाहनांचे नुकसान देखील झाले आहे. हे खड्डे वेळीच बुजवले गेले नाही तर गंभीर अपघात होऊन कोणाचा जीव देखील जाऊ शकतो.

त्यामुळे याकडे आपण तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. परिणामी सदर समस्या गणपती बाप्पाचे आगमन होण्याच्या अगोदर सोडवावी. सर्व रस्त्यावरील खड्डे योग्यप्रकारे पूर्णपणे भरण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा शिवसेना (उबाठा) स्टाईलने खड्यांमध्ये वृक्षारोपण करून आंदोलन करण्यात येईल. असे निवेदनात म्हटले आहे.

### स्टेट बँकेचा कारभार विजेविना

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा येथील भारतीय स्टेट बँकेच्या शाखेत मागील दीड ते दोन महिन्यांपासून बँकेचा कारभार हा लाईट अडखळत सुरु आहे. या ठिकाणी जनरेटर किंवा ईन्व्हरटरची सोय नसल्याने कर्मचाऱ्यांसह ग्राहकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

बँकेत आलेल्या ग्राहकांची कुचंबणा होऊ नये म्हणून बँकेतील कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून टॉर्च द्वारे कामे उरकून घेतली जात आहेत. म्हसळा शहरात गेले काही दिवस लाईट जाण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. लाईट गेली की ग्राहकांना बँकेच्या दैनंदिन व्यवहारातही अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. बँकेतील १५ वर्षे सेवा देणारा जनरेटर बंद असून त्याची दुरूस्ती देखील होत नाही.

# तहसीलदारांच्या सकारात्मक बैठकीनंतर उपोषण मागे!

**। माणगाव । वार्ताहर।**



नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध ज्वलंत प्रश्नांबाबत तोडगा काढण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे श्रीवर्धन विधानसभा सरचिटणीस झुल्फीकार टोल यांनी माणगाव तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची तत्काळ दखल घेत तहसीलदार दशरथ काळे यांनी उपोषणकर्त्यां सोबत सायंकाळी तहसील कार्यालयात बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली. तहसीलदारांनी घेतलेल्या सकारात्मक भूमिकेनंतर उपोषण माणगाव तहसीलदार काळे यांनी उपोषणकर्त्यांना पाणी देऊन उपोषण सोडले.

या चर्चेदरम्यान गोरेगाव ग्रामपंचायत हद्दीतील मुख्य रस्त्यालगतच्या अनधिकृत डंपिंग ग्राउंडमुळे निर्माण झालेल्या नागरिकांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या गंभीर समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन तहसीलदारांनी दिले. गुरुचरणच्या एक एकर असणाऱ्या जागेवर कचरा टाकण्याची व त्याची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया ग्रामपंचायत व ग्रामविकास अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून हाती घेण्याच्या सूचना दिल्या. याचबरोबर गोरेगाव बसस्थानकाची अत्यंत दयनीय अवस्था, प्रवाशांचे होणारे हाल व शौचालयातील अस्वच्छतेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. बसस्थानकाची दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना विविध समस्येला तोंड द्यावे लागत आहे. विशेष म्हणजे सन २०२४ मध्ये गोरेगाव बसस्थानकाच्या बांधकामासाठी एका कन्स्ट्रक्शन कंपनीला २ कोटी ६५ लाख रुपयांचा ठेका देण्यात आला होता. पावसाळ्यानंतर हे काम चालू होणार असल्याचे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे रायगड निरीक्षक यांनी सांगितले. तसेच तहसील कार्यालयातील सार्वजनिक शौचालय अस्वच्छ असल्याची तक्रार करण्यात आली. जर प्रमुख शासकीय कार्यालयाची अशी अवस्था असेल, तर नागरी भागातील परिस्थिति किती बिकट असेल? असा सवाल करताच तहसीलदार काळे यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना बोलावून चांगलेच सुनावले.

पान १ वरुन

## प्रकल्पाला नाही, प्रदूषणाला विरोध

सुरेश घरत यांनी सांगितले कि, विरोध प्रदूषणाला आहे. त्याबाबत कठोर कारवाईला आहे, प्रकल्पला नाही. कारण कंपनीच्या उद्घाटनाचा नारळ शेकापनेच फोडला होता आणि पर्यावरणपूरक विस्ताराचा नारळसुद्धा भविष्यात शेकापच फोडेल. जेएसडब्ल्यू कंपनी ही शेतकरी कामगार पक्ष सत्तेत असतानाच आली आहे. कंपनीच्या विस्ताराला शेकापने कधीच विरोध केला नाही. या तालुक्यात जेवढे प्रकल्प आले त्यात स्थानिकांना जर रोजगार मिळाला असेल तर तो फक्त शेकापमुळेच मिळाला आहे, हे सर्वांनाच ज्ञात आहे. रोजगार प्रत्येकालाच हवा आहे. पण कंपनीने रायगडचे भोपाळ बनवता कामा नये. कंपनीमुळे होणारे प्रदूषण सर्वजण पाहत आहेत. ज्यांना नोकरी मागत आहोत त्या स्थानिक नागरिकांची पुढची पिढी जन्माला तर यायला हवी, असा प्रश्नही घरत यांनी उपस्थित केला. अलिबागचे आर्थिक उत्पन्न पर्यटनावर अवलंबून आहे. प्रदूषण वाढले तर काय होईल सांगायला नको. कंत्राट मिळवून काहीजण गब्बर होतील पण हजारो लोकांचा रोजगार जाईल. त्यामुळे शेकापचा विरोध म्हणून उगाच ओरडणाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे की, प्रकल्प निश्चितच हवा आहे. पण कंत्राट मिळतील म्हणून नाही तर लोकांचे त्यातून भले झाले पाहिजे. या अगोदरच्या प्रकल्पांना आमचा विरोध आणि तुमचा पाठिंबा असे चित्र रंगवून काहीच उपयोग नाही. मागील काही वर्षात तालुक्यात कागदावर असे किती प्रकल्प आले आणि तुमच्या नाकासमोरून गुजरातला किती गेले हे संपूर्ण देशाला माहिती आहे.

विरोधक म्हणतात की, शेकाप प्रकल्पाला विरोध करते, असं असेल तर मागच्या प्रकल्पांना तुमच्या पाठिंब्यांचा व्हिडिओ किंवा फोटो सादर करावा, असे आवाहन सुरेश घरत यांनी विरोधकांना केले आहे.

## १ लाख बाप्पांची होणार प्रतिष्ठापना

अनुचित प्रकार घडू नये, गणेशोत्सव आनंदमय वातावरणात साजरा करता यावा म्हणून रायगड पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. पोलीस उप अधीक्षक ०७, पोलीस निरीक्षक २७, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक १२८, अंमलदार एक हजार ९००, होमगार्ड ५००, बाहेरील ३० पोलीस अधिकारी, ३०० पोलीस अंमलदार व एक एसआरपीएफ कंपनीचा समावेश असणार आहे.

बाजारपेठा फुल्ल

बाप्पाच्या स्वागतासाठी लागणारी फुले, फळे, पूजेसाठी लागणारे साहित्य , तसेच सजावटीसाठी लागणारे साहित्य विक्रीसाठी जिल्ह्यातील वेगवेगळ्या बाजारपेठांमध्ये दुकाने सजली आहे. प्लास्टीकच्या फुलांसह, माळा, विद्यूत रोषणाईचे साहित्य विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. हे साहित्य खरेदीसाठी ग्राहकांची दुकानांमध्ये गर्दी होऊ लागली आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी अवघे दोन दिवस शिल्लक असल्याने बाजारपेठा ग्राहकांनी फुल्ल असल्याचे दिसून येत आहे.

**चाकरमान्यांच्या सेवेसाठी १७२ एसटी सज्ज**

गणरायाचे आगमन बुधवारी(दि.२७) होणार आहे. त्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक राहिले आहेत. नोकरी व्यवसायानिमित्त मुंबई व ठाण्यात राहणाऱ्या चाकरमान्यांची रायगडसह कोकणात जाण्याची लगबग सुरु झाली आहे. मुंबई, ठाण्यातून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची गैरसोय होऊ नये यासाठी रायगडमधून जादा बसेसची मागणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातून १७२ बसेस रविवारी (दि. २३) पाठविल्या जाणार आहेत. सोमवारी(दि.२५) २७ आणि मंगळवारी(दि.२६) २७ अशा एकूण ५४ बसेस महाड आगारातून पाठविल्या जाणार आहेत.या बसेस ठाणे व मुंबईतील चाकरमान्यांना घेऊन कोकणात जाणार असल्याची माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

सहा ठिकाणी दुरुस्ती पथक

मुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा, एसटीचा बिघाड झाल्यास तातडीने त्याची दुरुस्ती व्हावी यासाठी एसटी महामंडळ रायगड विभागामार्फत जिल्ह्यात सहा ठिकाणी दुरुस्ती पथक नियुक्त केले आहे. खारपाडा, पेण, नागोठणे, कोलाड, महाड, कशेडी या भागात हे पथक नेमण्यात आले आहेत. या पथकामध्ये मॅकेनिक, पर्यवेक्षकांचा समावेश असणार असल्याचे सांगण्यात आले.

## अंबा नदी पात्रात एकजण गेला वाहून

पडले. मात्र त्यांना पुलाच्या पिलरचा आधार मिळाल्याने ते पिलरला पकडून थोडा वेळ उभे राहिले. त्यानंतर त्याठिकाणी उपस्थित असलेल्या नागरिकांकडून अनवर यांना पुलावर काढण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. अनवरला पुलाच्या वर घेण्यासाठी दोर टाकण्यात आले. मात्र दोरीला पकडून वर येत असतानाच अनवर यांच्या हातातून दोर सुटल्याने ते नदी पात्रात पडले. त्याचवेळी याठिकाणी उपस्थित असलेले पोलिस हे. कॉ. प्रकाश हंबीर यांनी नदीच्या पात्रात उडी घेऊन अनवर याला वाचविण्यासाठी केलेले शर्थीचे प्रयत्नही अपयशी ठरले. त्यानंतर एन व्ही आर एस एस टीम घटनास्थळी पोचल्यानंतर त्यांनी त्यांचे कार्य सुरू केले. थोड्या वेळाने अनवर शेख यांचा शोध घेण्यासाठी एस व्ही आर एस एस ची रेस्क्यू टीमही घटनास्थळी आली. त्यांच्याकडून अनवर यांचा अंबा नदीच्या पात्रात शोध सुरू आहे.

# महाड-पोलादपूरमध्ये धरपकड

## व्हेल माशाच्या उलटी तस्करीप्रकरण

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

पुणे जिल्ह्यातील भांबुर्डा वनपरिक्षेत्रालगतच्या वाहनांच्या झडतीमध्ये कोटयवधी रूपये आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत असलेली व्हेल माशाची उलटी हस्तगत करण्यात आली. यावेळी चार तरूणांपैकी एक मास्टरमाईंड तरूण पळून जाण्यात यशस्वी झाला असला तरी महाड तालुक्यातील दोन व पोलादपूर शहरातील एका तरूणावर झडप घालण्यात वनपरिक्षेत्राच्या अधिकाऱ्यांना यश आले असून शुक्रवारी आरोपींची धरपकड करण्यात आल्याची अधिकृत माहिती संबंधित अधिकृत सूत्रांनी दिली.

महाड, पोलादपूर तालुक्यातील तरूणांना व्हेल माशाची उलटी म्हणजे अम्बरग्रीस या तरंगणारे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पदार्थाची तस्करी करण्याची संधी मिळाली. त्यानुसार त्यांनी पुणे परिसरात व्हेल माशाची उलटीची विक्री करण्यासाठी एक इनोव्हा कार घेऊन पूर्णपणे योजना आखली. मात्र, वनविभागाला गुप्त सुत्रांमार्फत


( संग्रहित छायाचित्र )

माहिती मिळाली असल्याने नेमके भांबुर्डा वनपरिक्षेत्रालगत गुरूवारी रात्री तरूणांचे वाहन आढळून आल्यानंतर तरूण टप्प्यात आल्याने वनविभागाने त्यांचा परफेक्ट कार्यक्रम केला.

या छाप्यावेळी रोहित शंकर पवार या तरूणाने चतुराईने स्वत:ला सोडवून पळून जाण्यात यश मिळविले. उर्वरित तरूणांनी आपली ओळख व नांवे लपवून वनविभागाच्या अधिकाऱ्यांना बुचकळयात टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना फारकाळ त्यांची भूमिका टिकवून धरता न आल्याने त्यांची खरी नांवे आणि पत्ता समजणे सोपे गेले.

शुक्रवारी सकाळी पुणे न्यायालयामध्ये यापैकी महाड शहरालगत सुंदरवाडी येथील जय धारिया आणि पोलादपूर शहरातील रामजानकी अपार्टमेंटमधून स्वप्निल बबन मोरे या दोन तरूणांना ताब्यात घेऊन पुणे येथे न्यायालयामध्ये शनिवारी हजर करण्यासाठी नेले. या प्रकरणाची माहिती महाड आणि पोलादपूर शहरामध्ये कोणासही समजणार नाही, याबाबत पुणे भांबुर्डा वनपरिक्षेत्राकडून दक्षता घेण्यात आली असूनही वनविभागाच्या तपासकार्यामुळे काही नागरिकांना या प्रकरणाचा सुगावा लागला आहे.

यासंदर्भात अधिक माहिती मिळविता वनपरिक्षेत्राच्या सुत्रांनी मास्टरमाईंड असलेल्या रोहित शंकर पवार याच्या सांगण्यावरून काही तरूण या व्यवसायात झटपट पैसा मिळवून श्रीमंत होण्यासाठी सहभागी झाले. यापैकी काही तरूण चेहऱ्यावर अतिशय साधेपणा घेऊन वावरत असले तरी त्यांचे पुणे येथे अतिशय उच्चभ्रू श्रीमंतांच्या वस्तीमध्ये वास्तव्य असल्याचे तपासादरम्यान समजून आले, अशी माहिती देताना रोहित पवारला ताब्यात घेतल्यानंतर या व्हेल माशाची उलटी प्रकरणात आणखी किती तरूणांचे रॅकेट अस्तित्वात आहे, याबाबत माहिती उघड होणार असून शनिवारी महाड व पोलादपूर येथून धरपकड करण्यात आलेल्या दोन आरोपींसह छाप्यावेळी पकडलेल्या आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून पुढील तपासादरम्यान आणखी काही तरूण महाड व पोलादपूर तालुक्यांमधून हस्तगत करण्यात येण्याची वर्तविण्यात येत आहे.

पुणे भांबुर्डा वनपरिक्षेत्रातील वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी आतापर्यंत व्हेल माशाची उलटी तस्करीची अनेक प्रकरणे मुद्देमालासह उघडकीस आणली असून पुणे भांबुर्डा येथील आरएफओ बारबोले यांनी गुरूवारच्या कारवाईचे नेतृत्व करून तपास कार्य केले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

## निवडक

### माथेरान घाटात तीन वाहनांचा अपघात

**माथेरानः** घाटातील जुमापट्टी येथे शनिवारी (दि.२३) सकाळी झालेल्या विचित्र अपघाताने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणाचा पुन्हा एकदा पर्दाफाश केला आहे. एस-टर्न या अवघड वळणावर एकाच वेळी तीन वाहने एकमेकांवर आदळली असून अपघातात जीवितहानी टळली असली तरी



वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. मान्सून सुरू झाल्यानंतर माथेरान घाटातील गटारे साफ करण्यात आली नाहीत. त्यामुळे गटारातील पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आल्याने रस्त्यावरील डांबर निघून जाऊन मोठ्या प्रमाणात खड्यांच्या स्वरूपात चरी पडल्या आहेत. त्याच बरोबर खड्ड्यांतील खडी देखील रस्त्यावर पसरली आहे. परिणामी, वाहन चालक घाट उतरत असताना ब्रेक मारताना वाहनावरील नियंत्रण गमावून बसतात आणि अपघात होतात.त्यातच शनिवारी मुंबई, ठाणे जिल्ह्यातील आलेले पर्यटक हे सकाळी घाट उतरत असताना खडीवर वाहनाचे नियंत्रण सुटल्याने समोरून घाट चढत असलेल्या कारवर धडकले. त्याचवेळी मागोमाग येणारी आणखी एक कारही नियंत्रण सुटल्याने अपघातग्रस्त वाहनावर आदळली. सुदैवाने मोठा अनर्थ टळला. दरम्यान, या अपघातामुळे घाटातील सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

### श्रीवर्धनला वाहतूक कोंडीचे ग्रहण

**श्रीवर्धनः** शहरामध्ये वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. वाहतूक कोंडीमुळे पाच मिनिटाच्या प्रवासासाठी नागरिकांना २० ते २५ मिनिटे वाया घालवावी लागतात. श्रीवर्धन शहरातील वाणी आळी परिसरात अनेक नामांकित बँकेच्या शाखा आहेत. त्यासह विविध फायनान्स कंपन्यांच्या देखील शाखा आहेत. त्यामुळे या परिसरामध्ये बँकेत कामानिमित्त जाणारे नागरिक रस्त्याच्या दुतर्फा वेड्यावाकड्या दुचाकी उभ्या करत असल्यामुळे नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. शहरातील टिळक मार्ग परिसरात देखील हीच परिस्थिती आहे. तर, श्रीवर्धन बाजारपेठेत अक्षरशः दुचाकींचे वाहन तळ आहे की काय? अशी शंका निर्माण होते. त्यातच या ठिकाणी असलेल्या व्यापाऱ्यांकडे माल खाली करण्यासाठी ट्रक किंवा टेम्पो आल्यानंतर वाहतुकीच्या कोंडीत मोठ्या प्रमाणावर भर पडते. श्रीवर्धन शहरात काही अधिकृत रिक्षा स्टॅन्ड वगळता अन्य ठिकाणी रिक्षाचालकांनी आपल्या रिक्षा उभ्या करून रिक्षा स्टॅन्ड तयार केले आहेत. तरी श्रीवर्धन नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी अशा रस्ता अडवणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

### रोह्यात गावठीदारूचा अड्डा उद्ध्वस्त

**रोहा :** ग्रामीण भागात विशेषतः जंगल परिसरात गावठी दारू निर्मितीचे अवैध धंदे खुलेआमपणे सुरु आहेत. पोलीस उप अधी-क्षक रवींद्र दौडंकर यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या नेतृत्वाखाली रोहा पोलिसांनी शुक्रवारी (दि.२२) खडकी या जंगलात रात्रीच्या वेळी जाऊन गावठी दारूचा अड्डा



उद्ध्वस्त केला आहे. तसेच, गावठी दारूचा धंदा करणाऱ्या तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे गावठी दारू माफियांचे धाबे दणाणले आहेत. या धडक कारवाईत पोलिसांना गावठी हातभट्टी दारूसाठी लागणारे ६० लिटर तयार दारूचे ३ प्लास्टिकचे ड्रम, ६ निळ्या रंगाचे नवसागर मिश्रित रसायने भरलेले पिंप असे एकूण ९१,२०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन केला आहे. या बाबत पोलीस कर्मचारी राजेंद्र कोंडार यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून आरोपी मिथुन काशिनाथ हिरवे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पीएनपी नाट्यगृहात मराठमोळ्या स्पर्धेचे आयोजन

# हक्काचे व्यासपीठ देणारी पीएनपी संस्था

## चित्रलेखा पाटील यांचे गौरवोद्गार

**| रायगड | प्रतिनिधी |**

**संगणकीय आणि स्पर्धेच्या युगात शैक्षणिक क्षेत्रातील प्रगती साध्य करण्यासाठी उद्दिष्टांचे ओझे वाहण्याचे काम सुरु आहे. शैक्षणिक उद्दिष्ट पूर्ण करताना आपल्या संस्कृतीचा विसर भावी पिढीला पडत आहे. देशाचे भविष्य असणाऱ्या युवा पिढीला आपल्या परंपरा समजावल्या पाहिजेत. परंपरेतून सर्वांगीण विकास ही संकल्पना राबवून सुजाण नागरिक घडविण्याचे कार्य पीएनपी शैक्षणिक संस्था करीत आहे. तसेच, पीएनपी संस्था ही नेहमी वेगवेगळे उपक्रम राबवून सर्वांना हक्काचे व्यासपीठ देणारी संस्था आहे, असे गौरवोद्गार पीएनपी शैक्षणिक संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील यांनी काढले.**

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कुल यांनी शनिवारी (दि.२३) चेंढरे येथील पीएनपी नाट्यगृहात मराठमोळ्या स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात गणेश महोत्सव सजावट स्पर्धेमध्ये इको फ्रेंडली गणपती डेकोरेशन, मोदक स्पर्धा, भजन स्पर्धा, फॅमिली डान्स असे विविध उपक्रम घेण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

त्या पुढे म्हणाल्या की, गणेशोत्सव उंबरठ्यावर असताना सर्वत्र सजावट आणि खरेदीची लगबग सुरू आहे. अशा क्षणी वेश्वीच्या पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कुलमधील विद्यार्थ्यांनी साकारलेली आपली परंपरा लक्षवेधी आहे. या गणेश महोत्सवानिमित्त आयोजित



स्पर्धांमध्ये विजेते झालेल्या स्पर्धकांचे अभिनंदन आहेच, परंतु ज्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून आपले अस्तित्व सिद्ध केले आशा स्पर्धकांचे देखील कौतुक आहे. कारण परंपरा जतन करण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे, असे चित्रलेखा पाटील म्हणाल्या. तसेच, भविष्यात शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल अपेक्षित आहेत. आजचा अलिबाग येत्या काही वर्षात महा मुंबईचा भाग बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. पालकांनी आपल्या पाल्याच्या भविष्यातील यशाचा सारासार विचार करण्याची हीच वेळ आहे. आपल्या मुलांची ध्येय आणि त्यांच्या मनातील संकल्पना सत्यात उतरविण्यासाठी आपल्याकडे जागेचे भांडवल अपेक्षित आहे. यासाठी योग्य तो विचार करा आणि आपल्या जागा विकू नका. भावी पिढीच्या मागे जागेचे भांडवल उभे करण्याचे नियोजन करा, असा सल्ला देखील चित्रलेखा पाटील यांनी उपस्थित पालकांना दिला आहे.

या कार्यक्रमासाठी पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या समवेत प्रमुख पाहुणे आणि स्पर्धेचे परीक्षक म्हणून रायगड मधीलसुप्रसिद्धडान्सकोरिओग्राफर जयेश पाटील, प्रसिद्ध गायिका भूमी योगेश कालबेरे, शिल्पकार तथा पेंटिंग आर्टिस्ट महेंद्र गावंड, मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर, इंग्रजी माध्यम अँकॅडमीक डायरेक्टर राजश्री पाटील, लेखापाल अंकित भानुशाली, कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेमध्ये अनेक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यात इको फ्रेंडली डेकोरेशन स्पर्धेमध्ये अनय मढवी आणि ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावला असून गौरी पाटील आणि ग्रुपने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. मोदक स्पर्धेत निर्वाण घुगे आणि ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावला आहे. फॅमिली डान्स प्रकारामध्ये व्योम भगत आणि ग्रुपने प्रथम क्रमांक तर, अभियांशी राणा आणि ग्रुपने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. संगीत रत्न प्रकारात आहान पेरेकर आणि ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावला असून व्योम भगत आणि ग्रुपने द्वितीय क्रमांक पटकावले आहे. तर, गणेश महोत्सव सुपरस्टार फॅमिली या गटात गौरी पाटील आणि ग्रुप प्रथम तर अनय मढवी आणि ग्रुप द्वितीय क्रमांकाने विजेते ठरले आहेत. यावेळी विजेत्यांसह सहभागी स्पर्धकांना देखील मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## उल्हास नदीवरील पूल अवजड वाहतुकीस बंदी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवरअसलेलादहिवली-मालेगाव येथील पुल अवजड वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. या बाबत सूचना देणारे फलक सार्वजनिक बांधकाम विभागाने लावले आहेत. दरम्यान, नेरळ गावातून मुरबाडकडे जाणारी अवजड वाहनांची वाहतूक भीमाशंकर राज्यमार्ग रस्त्याने वळविण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे.




माथेरान-कळंब या राज्यमार्गावरील उल्हास नदीवर असलेल्या दहिवली-मालेगाव येथील पूल बॅरिस्टर ए आर अंतुले मुख्यमंत्री असताना बांधण्यात आला होता. हा पुल कमी उंचीचा असल्याने पावसाळ्यात या पुलावरून सातत्याने पाणी जात असते. त्यामुळे हा पुला आता धोकादायक बनला असून या पुलावरून अवजड वाहतूक बंद करण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आल्यानंतर या पुलाच्या बाजूला नवीन पुल उभारण्याचे काम बांधकाम खात्याने मंजूर केले आहे. २०२४ मध्ये २५ कोटीचा निधी देखील मंजूर झाला होता. मात्र, ठेकेदारा कंपनी निश्चित होत नसल्याने या पुलाचे काम लांबणीवर पडले. परंतु; पुलाचे काम यावर्षी सुरू झाले असून वेळेत पूर्ण होऊ शकले नाही.

## दोन सराईत चोरट्यांना अटक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

स्कॉर्पिओची चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना नवी मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. सुरेश कालुराम उदाणी (३०), रिचपाल पप्पुराम बिष्णोई (२४) अशी या चोरट्यांची नावे आहेत. त्यांची गुन्हे शाखेकडून कसून चौकशी करण्यात येत आहे. जून महिन्यात दोन चोरट्यांनी नवीन पनवेल परिसरातून एक स्कॉर्पिओ चोरुन नेली होती. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने या गुन्ह्याचा तपास सुरू केला. त्यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवली. दोघेही मूळचे राजस्थान येथील असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, आरोपी वारंवार ठिकाण बदलत असल्याने त्यांना पकडणे कठीण होत होते. दोन्ही आरोपी कल्याण-भिवंडी रोड परिसरातील टेमघर येथे येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने या परिसरात सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर चौकशीत त्यांनी हा गुन्हा केल्याचे कबूल केले.

## उरण-करंजा रस्त्याला भ्रष्टाचाराचा फटका



**| उरण | प्रतिनिधी |**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तब्बल चार कोटींचा निधीतून नव्याने बांधण्यात आलेला उरण-करंजा रस्ता केवळ दोन महिन्यांतच खड्डेमय झाला आहे. पावसाळ्यात या रस्त्यामुळे प्रवाशांना व नागरिकांना जीवघेण्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. हा प्रकार म्हणजे ठेकेदार व अधिकाऱ्यांच्या संगनमतात झालेल्या उघड उघड भ्रष्टाचाराचे उदाहरण असून, शासनाच्या प्रतिष्ठेलाच या गैरकारभाराने धक्का बसला आहे. शासनाचा पैसा खाऊन निकृष्ट माल वापरून केलेले हे काम म्हणजे जनतेच्या विश्वासघाताचे प्रत्यक्ष चित्र आहे, असे स्थानिकांमधून बोलले जात आहे. शेतकरी कामगार पक्षाचे तालुका युवा उपाध्यक्ष मुकेश प्रकाश थळी यांनी उपविभागीय अभियंत्यास दिलेल्या पत्राद्वारे या भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवत ठेकेदाराच्या निकृष्ट कामगिरीवर तात्काळ चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे. गणेशोत्सवाच्या सणाआधी हा रस्ता दुरुस्त न झाल्यास नागरिक व भाविक मोठ्या संकटात सापडतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## डोळवली रस्त्याला डबक्याचे स्वरूप

**| खोपोली | प्रतिनिधी |**

खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागांना जोडणाऱ्या बहुतांशी रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून लहान मोठ्या अपघातांबरोबर वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होत आहे. दैनंदिन त्रासामुळे सर्वसामान्य नागरिकांसह प्रवासी, वाहन चालक कमालीचे संतप्त झाले आहेत. त्यातच तालुक्यातील माणकीवली ग्रामपंचायत हद्दीतील डोळवली गावामधील मुख्य रस्त्याची खड्डेमय अवस्था झाली असून या ठिकाणी डब्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे प्रवासी वर्गात संबधित खड्डेमय रस्त्याबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

## मुरबाड रस्ता खड्ड्यात

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यालाच लागून ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुका आहे. या ठिकाणी कर्जतमधील तरुण नोकरीसाठी जात असतात. त्याच तरुणांसाठी चालवली जाणारी मुरबाड एसटी गाडी रस्त्यातील खड्ड्यांमुळे बंद पडत आहे. नोकरी करणाऱ्या तरुणांचे हाल रोखण्यासाठी संबंधती प्रशासनाने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी चई येथील ग्रामस्थ कृष्णा शिंगोळे यांनी केली आहे.



ठाणे जिल्ह्यातील मुरबाड या ठिकाणी औद्योगिक वसाहत आहे. कर्जत सह खालापूर तालुक्यातील तरूण अंबरनाथ, उल्हासनगर व मुरबाड या जवळच्या तालुक्यातील कारखान्यांत नोकरीसाठी जात असतात.त्यात कर्जत तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या ओलमन, नांदगाव, बळीवरे भागातील असंख्य तरुण हे नोकरीसाठी मुरबाड तालुक्यात जात असतात. परंतु, कर्जत तालुक्यातील बळीवरे चई, नांदगाव भागातून मुरबाड तालुक्यात जाणारा रस्ता खड्ड्यात हरवला आहे. त्यामुळे मुरबाड एसटी आगाराने या भागासाठी चालविलेली एसटी गाडी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. ही बस सेवा कायम सुरू रहावी यासाठी कर्जत तालुक्यातील सरकारी अधिकाऱ्यांनी रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी कृष्णा शिंगोळे यांनी केली आहे.

### हेमंत ढोमेच्या चित्रपटाचे चित्रीकरण सुरु | 'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला

# नागांव हायस्कूलमध्ये भरणार कलाकारांची शाळा

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

गेल्या काही वर्षांत हेमंत ढोमेने अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता अशी ओळख निर्माण केली आहे. झिम्मा, झिम्मा २, फसक्लास दाभाडे या चित्रपटांचे दिग्दर्शन हेमंत ढोमेने केले आहे. फर्स्टक्लास दाभाडेच्या यशानंतर हेमंत ढोमे व क्षिती जोग पुन्हा एकदा एका नवीन चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. नुकताच त्यांच्या नवीन चित्रपटाचा मुहूर्त पार पडला. त्यांच्या 'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम' या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली असून संचालक मंडळ नागाव हायस्कूल शाळेत त्याचे चित्रीकरण होणार आहे.

आपल्या प्रत्येकाच्या जडणघडणीत आपल्या शाळेचे मोठे योगदान असते आणि त्यातही मराठी माध्यमाच्या शाळा म्हणजे आपल्या मनावर मायबोलीचे संस्कार करणारे ज्ञानमंदिरच असते. सद्यस्थितीवर मार्मिक पद्धतीने भाष्य करणाऱ्या 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' या मराठी चित्रपटाचा मुहूर्त सोहळा अलिबाग येथे नुकताच पार पडला. या चित्रपटाची निर्माती क्षिती जोग आहे. सिनेमाचे लेखन आणि दिग्दर्शनाची जबाबदारी हेमंत ढोमेची आहे.




### अलिबाग, मुरुड तालुक्यात होणार चित्रीकरण

**या चित्रपटाचे चित्रीकरण अलिबाग, नागाव, चौल-रेवदंडा, मुरुड-जंजिरा या परिसरात होत असल्याचा विशेष आनंद व अभिमान अलिबागकरांनी तसेच आ. अदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे. दिग्दर्शक हेमंत ढोमे व निर्मात्या क्षिती जोग हे नेहमीच समाजाला आरसा दाखवणारे, आशयसंपन्न चित्रपट आपल्यासाठी घेऊन येत असतात. हा नवीन चित्रपटही असाच मनाला स्पर्श करणारा ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**

### सोशल मिडियावर पोस्ट व्हायरल

**नवीन चित्रपटाचे फोटो शेअर करताना हेमंत ढोमेने लिहिले की, आता मराठी शाळा पुन्हा भरणार. आपल्या नव्या चित्रपटाचा मुहूर्त महाराष्ट्राच्या महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते संपन्न झाला. क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम लवकरच तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात. गणपती बाप्पा मोरया! ही पोस्ट शेअर करताना हेमंत ढोमेने क्षिती जोग व चलतचित्र मंडळाला टॅग केले.**

> **आज मी जे काही आहे, ते माझ्या मराठी शाळांमुळेच आहे. मातृभाषेतून शिकताना मला माझी संस्कृती, परंपरा आणि माणसं समजली. पण आज मराठी शाळा कमी होत चालल्या आहेत ही चिंतेची बाब आहे. या चित्रपटातून मातृभाषेतून होणारे शिक्षण कमीपणाचे नसून खऱ्या अर्थाने समृद्ध करणारे आहे, हे अधोरेखित करण्याचा प्रयत्न असेल. मुहूर्ताला आदिती तटकरे यांसारख्या समाजभान असलेल्या लोकप्रतिनिधींचा पाठिंबा मिळणे ही माझ्यासाठी आनंदाची बाब आहे.**
> **- हेमंत ढोमे, दिग्दर्शक**

कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



: प्रायोजक :
आरडीसीसी बँक सहप्रवास प्रगतीचा ISO 9001 - 2015 BANK

जिंका रोज आकर्षक बक्षिस

प्रवेश मूल्य २०० रु. (फोटो काढण्याचे मूल्य वेगळे आकारले जाईल.)

आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

स्पर्धेचे स्वरूप
- आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला 'कृषीवल'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
- स्पर्धा २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत घेतली जाईल.

फोटोसाठी स्थानिक संपर्क

| | | |
|---|---|---|
| सुरेश खडपे (चौल) : ९९२१०५४६०६ | समीर रिसबुड (श्रीवर्धन): ९८८१९२२८३५ | बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा): ९८६०६०९६५४ |
| जीवन पाटील(भाकरवड) : ७०६६८९८६३७/ ८१४९६६३८१३ | दत्ता म्हात्रे : (चिरनेर) : ७२०८३७७१०५ | भूषण सुतार (सुधागड) : ८१४९६६४०५८ |
| संजय गायकवाड (कर्जत) : ९४२३३७७९०० | जुनेद तांबोळी (महाड) : ८४११९२४४६२ | सत्यप्रसाद आढाव (रोहा) : ८९८३४२०१६१ |
| समीर मालोदे (अलिबाग) : ९४२३३७५३६१ | शैलेश पालकर (पोलादपूर) :९२२६८४९१८५ | अब्दुल सोगावकर (सोगाव) : ९९६०४८११३३ |
| मुकुंद रांजणे (माथेरान) : ७५०७६७३८७९ | कांता हाबळे (नेरळ) : ९२०९२३८७६९ | गणेश चोढणेकर (मुरुड) : ९२६००१६३२३ |
| अनिल गवळे (वेणगाव) : ९६८९९५४४२४ | राजू नेवासेकर (मुरुड) : ९९२१६२३८४८/ ८२३७१३८९७४ | वैशाली मलबारी (पेण) : ८९८३९३६४५५ |
| नंदकुमार मरोदे (खांब) : ८३०८६८८२२९ | सुनील ठाकूर (उरण) : ८१०८९२१५६५ | अल्ताफ चोरडेकर (रोहा) : ८८०५२४९५६७ |
| सलीम शेख (माणगाव) : ९४२३३८२७८९ | मुस्कान खान (पेण) : ८९२८९११३९१ | सिद्धी दाखिणकर (माणगाव) : ७४९९३११८१७ |
| सुधीर नाझरे (मुरुड): ९४२३३७७२४२ | राकेश खराडे (रसायनी) : ९६६५३१४११५ | |

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906

फोटो पाठविण्याची वेळ स. १०.३० ते संध्या. ५.३० वा. पर्यंत.

# अस्वच्छ स्टॉल धारकाची हातगाडी जप्त

## ● मुरूड नगरपरिषदेची धडक कारवाई

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात पर्यटकांसह स्थानिकांची वर्दळ असते. त्यामुळे स्थानिकांना रोजगार देखील उपलब्ध झाला आहे. त्यांनी समुद्रकिनाऱ्याजवळ खाण्याचे स्टॉल उभे केले आहेत. परंतु, येथील काही स्टॉल धारकांच्या हातगाडी जवळ अस्वच्छता पसरलेली असते. त्यातून दुर्गंधीही येत असते. त्यामुळे स्टॉलवर येणाऱ्यांना खवय्यांना नाक दाबून पदार्थांचा आस्वाद घ्यावा लागतो. तसेच, अस्वच्छतेमुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्नही उद्भवत आहे. याबाबत नगर परिषदेकडे वारंवार तक्रारी येत होत्या. त्याची दखल घेत नगरपरिषदेने धडक कारवाई करत संबंधीत स्टॉल धारकाची हातगाडी जप्त केली.






मुरूड समुद्रकिनाऱ्यावर दिवसेंदिवस पर्यटकांची संख्या वाढत आहे. ऐतिहासीक जंजीरा किल्ला पाहण्यासाठी देखील पर्यटक समुद्रकिनाऱ्याजवळचा रस्ता अवलंबतात. त्यामुळे या मार्गावरून जाताना त्यांना समुद्रकिनारी जाण्याचा मोह आवरता येत नाही. त्यामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. मुरूड समुद्रकिनारी स्थानिक स्टॉल धारक गोपाल शर्मा यांची पाणीपुरीची हातगाडी आहे. या हातगाडीवर असंख्य स्थानिक व पर्यटक पाणीपुरी खाण्यासाठी येत असतात. परंतु, या स्टॉल परिसरात नेहमीच अस्वच्छता पसरलेली असते. गोपाल शर्मा व त्यांचा कामगार हातगाडीवरील असलेली भांडी व साधने उघड्यावर धुतात. त्यातून निघाणाऱ्या सांडपाण्याची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावल्यामुळे रस्त्यावर पसरते. परिणामी या परिसरात दुर्गंधी पसरते. त्यामुळे या ठिकाणी तसेच आजुबाजूच्या स्टॉलवर येणाऱ्या खवय्यांना नाक दाबून पदार्थांचा आस्वद घेण्याची वेळ येते. तसेच, त्यांच्या आरोग्याचाही प्रश्न उद्भवतो. त्याचबरोबर गोपाळ शर्मा यांच्या हातगाडीजवळ बसण्याची सोय ही रस्त्यालगतच केल्यामुळे रहदारीसाठी अडथळा निर्माण होत असतो. याबाबत मुरुड-जंजिरा नगरपरिषदेकडे वारंवार तक्रारी दाखल होत होत्या. अखेर नगरपरिषदेच्यावतीने गोपाल शर्मा यांच्या पाणीपुरी स्टॉलवर धडक कारवाई करण्यात आली. त्यांची हातगाडी जप्त करून दंड देखील वसूल करण्यात आला. तसेच, याप्रकारची पुनरावृत्ती होणार नाही,

> मुरुड-जंजिरा पर्यटन स्थळ असून या ठिकाणी शेकडो पर्यटक समुद्रकिनारी ये-जा करित असतात. परंतु, या ठिकाणी आपणच अस्वच्छता पसरवली तर पर्यटक या ठिकाणी थांबणार नाहीत व त्याचा परिणाम स्थानिकांच्या व्यवसायावर होईल. त्यामुळे आता समुद्र किनाऱ्यावर अथवा शहरात अस्वच्छता निर्माण करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल. स्वच्छता राखणे ही सर्वांची जबाबदारी असून अस्वच्छता करणाऱ्याला कोणतीही सूट दिली जाणार नाही. तरी प्रत्येक स्टॉल धारकांसह नागरिकांनी यांची नोंद घ्यावी.
>
> **- सचिन बच्छाव,**
> **मुख्याधिकारी तथा प्रशासक,**
> **मुरूड-जंजिरा नगरपरिषद**

याबाबत गोपाल शर्मा यांच्याकडून हमीपत्र लिहून घेण्यात आले आहे. त्यामुळे इतर नियमांचे उल्लंघन करू पाहणाऱ्या स्टॉलधारकांचे देखील धाबे दणाणले आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# यंदाही बाप्पाचे आगमन खड्ड्यातुनच

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड शहराला खड्ड्यांचे ग्रहण लागले असून यंदाही बाप्पचे आगमन खड्ड्यातूनच होणार असल्याचे दिसून येत आहे. मुरूडमधील परेश नाका पासून मच्छिमार्केट ते एकदारा पुलापर्यंतच्या रस्ताला खड्डे पडले आहेत. या परिसरातील खड्डे बुजविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला भर पावसात मुहुर्त सापडत असून नुसते डांबर खड्डी व भुसा टाकून खड्डे भरले जातात. परंतु, ही खडी पावासाच्या सरीत वाहुन जाते आणि पुन्हा परिस्थीती जैसे थेच होते. त्यामुळे नागरिकांना व वाहन चालकांना या खड्डेमय रस्त्यातून नाहक त्रास सहन करत प्रवास करावा लागत आहे. हा रस्ता नव्याने बनविण्यासाठी राज्य सरकारने लाखो रुपयांचा निधी मंजूर केला आहे. परंतु, हा निधी दोन वर्ष संबंधित प्रशासनाकडे पडुन असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे फक्त डागडुजी करायची आणि शासनाचा पैसा वाया घालावाचा, असा कारभार चालू आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाला कधी जाग येणार, असा प्रश्न विचारला जात आहे. त्यातच गणपती बाप्पाचे आगमन



देखील काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. त्यामुळे यंदाही बाप्पाचे आगमन खड्ड्यांमधूनच होणार की काय, अशी चिंता गणेश भक्तांमध्ये पसरली आहे.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री.गोपाळ गोविंद राणे यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन :- मौजे. गुढवण, ता.कर्जत, जि.रायगड येथिल मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३ | ११ | ०-०२-५० | ०-०६ |
| ३ | १४ | ०-०७-३० | ०-०३ |
| ३ | १० | ०-०२-८० | ०-०६ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. २४/०८/२०२५.

**ॲड.नरेश रामदास आहीर.**
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
मो.-९३२५०६००३७.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.सारस इन्फ्राटेक (भागीदारी संस्था), यांनी भुखंडधारक/परवानाधारक (१) श्री.तुळशीराम जाना पारगांवकर, (२) श्रीमती. यमुना मोरश्वर म्हात्रे, (३) श्रीमती वंदना भरत पाटील, (४) श्री. रमेश द्वारकानाथ पारगांवकर, (७) श्रीमती. सावित्री कमळाकर भोईर, (६) श्री. रविंद्र डी पारगांवकर, (७) श्री. महेंद्र डी पारगांवकर, (८) श्री. ज्ञानेश्वर डी पारगांवकर, (९) श्री. सुनिल किसन पारगांवकर, (१०) श्री. अनिल किसन पारगांवकर, (११) श्री. मिलिंद किसन पारगांवकर, यांच्याकडुन त्यांच्या मालकी हक्क/हिश्यातील, सिडकोच्या १२.५% योजनेअंतर्गत सिडको संचिका क्रमांक: उलवे - ११६१ अन्वये मौजे. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड येथे सेक्टर-२२, भुखंड क्र. ७बी, मधील क्षेत्र १५० चौ. मी. क्षेत्राचे दिनांक : ०६/०६/२०२५ रोजीच्या अंतरिम इरादापत्र संदर्भ क्रमांकः सिडको/भूमी/साटयो/उलवे-११६१/२०२५ नुसार इरादित करण्यात आलेला भुखंड हा भुखंडधारक यांनी आमच्या अशिलांना वर दर्शविलेले भुखंडधारक यांचेबरोबर विकासाचा करारनामा करुन विकसित करण्याचे ठरविले असून सदर भुखंडाच्या संपूर्ण क्षेत्रापैकी ५० टक्के म्हणजेच अंदाजे ७५ चौ. मी. क्षेत्राचे सिडकोची पुर्व परवानगी घेवून आमच्या अशिलांच्या लाभांत त्रिपक्षीय कराराने हस्तांतरण करण्याचे निश्चित केले आहे, तरीही या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, सदर कराराची पूर्तता/भुखंडाचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, उपरोक्त भुखंडावर अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस-पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एलएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवश्यक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदरहु भुखंडासंदर्भातील सिडकोची पूर्व परवानगी घेऊन व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे,

कळावे,
**सही : ॲड. अजित व्ही. सिंग (खरेदीदारासाठी)**
अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ता: १६/१७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे.
फोन नं. ०२२- ४००२६१४२
E-Mail ID - ajeet_advocate@yahoo.co.in
दिनांक : २२/०८/२०२५

दिनांक : २३/०८/२०२५

## जाहीर हरकत नोटीस

सर्व लोकांस या नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे आशिल श्री.सुहास पांडुरंग श्रावंदे रा.थळ बाजार, पो.थळ, ता.अलिबाग जि.रायगड यांनी मौजे थळ, ता.अलिबाग येथील भुमापन क्रमांक २९७/१/१४५, क्षेत्र ०-०१-८० हे.आर., आकार ०० रू. पै. या मिळकतीवर त्याचे स्वकष्टाने घर बांधलेले असुन सदर घराचा ग्रुप ग्रामपंचायत थळ याच्या कार्यालयीन दप्तरी मालमत्ता क्रं १०८७ ब/१ असा आहे. सदर घरात माझे अशिल त्यांच्या कुटुंबासमवेत राहत आहेत. सदर घराखालची जागा म्हणजेच वरील भूमापन क्रमांक मिळकत शंकर रामभाऊ श्रावंदे यानी विकण्यास काढल्याचे आमच्या अशिलास समजले आहे. त्यामुळे अशी मिळकत त्रयस्त इसमाने विकत घेतल्यास सदर विकत घेणाऱ्या इसमाची व आमच्या अशिलांची फसवणूक होईल तसेच सदरचा होणारा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तरी या नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे थळ, ता.अलिबाग भुमापन क्रमांक २९७/१/१४५, क्षेत्र ०-०१-८० हे.आर., आकार ०० रू.पै. सदरची मिळकत कोणीही विकत घेवू नये व तसा सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करू नये. याऊपर तसा व्यवहार केल्यास तो आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्यावेळी होणाऱ्या सर्व परिणामांस सर्वस्वी व्यवहार करणारी व्यक्तीच जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २३/०८/२०२५

सही/-
**(श्री. सचिन दि.पाटील)**
ॲडव्होकेट
अलिबाग कार्यालय:-२१, पारिजात सोसायटी चेंढरे, अलिबाग, जि.रायगड,
मोबा.नं. ९२२६८७२६९०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन ही मी किशोर हरिश्चंद्र परकर यांचे सामाईक मालकीची असून सदर मिळकतीमध्ये श्रीमती रूणा अरूण परकर, श्री.राजेश अनंत जावकर, श्री.सचिन अनंत जावकर, श्री.जिवेश गजानन परकर, सौ. विद्याश्री गजानन चिंदरकर, श्रीमती मनीषा प्रभाकर परकर, श्री.आकाश प्रभाकर परकर, श्रीमती अक्षता विनोद चव्हाण, श्री.राहुल किशोर परकर व श्री.किशोर हरिश्चंद्र परकर हे सर्व सामाईक मालक म्हणून दाखल आहेत. या मिळकतीबाबत अलिबाग येथील दिवाणी कोर्टामधे रे.मु.नं.५/२०१४ हा दावा दाखल आहे, व याचे काम कोर्टात प्रलंबित आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हि.नं. | मुंबईच्या मिळकती |
|---|---|---|---|
| रेवदंडा | १२२ | ४ | मुंबई गिरगाव सी.पी.टँक रोड, सीटी.सर्व्हे नं.३१२९ व १,३१२९ (जुनी सी वॉर्ड नं.६५०८ (१) व ६५०८(२) व त्यावरील दोन इमारती |
| रेवदंडा | ६० | ६० | |
| रेवदंडा | ६० | ४१ | |
| रेवदंडा | ६० | ३३ | |
| रेवदंडा | ६० | २९ | |
| नागाव | १३७६ | - | |
| नागाव | १४२४ | - | |
| चौल | ८९७ | - | |
| चौल | १४२४ | - | |

तसेच मौजे रेवदंडा येथील घर नं. ७९०, ७९३, ७९३अ, ७९४, ७२५, १६९२अ, १६९३ब, १६९३क ही घरे, मुंबई गिरगाव सी.पी.टँक येथील घरे

सदर मिळकतीमधे आता आपले नाव मिळकतीचे ७/१२ सदरी आहे या गोष्टीचा गैरकायदा घेत श्री जिवेश गजानन परकर हे यापैकी काही मिळकतीची विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे असे मला समजले आहे. या मिळकतींचे वाटप अद्याप झालेले नसल्याने व सर्व मिळकत ही सामाईक असल्याने या मिळकतीमधील क्षेत्र विक्री करण्याचा श्री.जिवेश गजानन परकर यांना अथवा अन्य कोणत्याही सहमालकांस कायद्याने कोणताही मालकी हक्क प्राप्त झालेला नाही, अशा प्रकारे या मिळकतीमधील क्षेत्राची विक्री करणे बेकायदेशीर आहे. त्यातही मिळकतीबाबत दावा प्रलंबीत असताना आता अशी विक्री करणे देखील कायदेशीर नाही. ही बाब तमाम लोकांना अवगत करण्याकरीता मी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करत आहे.

सबब सर्व लोकांस याद्वारे कळविण्यात येते की, या मिळकतीबाबत श्री.जिवेश गजानन परकर अथवा अन्य यांचे सोबत कोणीही कसलाही साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही व्यवहार करू नये अथवा मिळकतीमधे कोणताही हक्क, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, असा हितसंबंध निर्माण करू नये, या उपरही कोणी असा काही व्यवहार करार मदार केल्यास सदर व्यवहार हा माझेवर बंधनकारक राहणार नाही, व यानंतर अशा प्रकारे मिळकत विकत घेणार व्यक्ती ''बोनाफाईड पर्चेसर फॉर व्हॅल्यु विदाउट नोटीस'' असा बचावही घेऊ शकणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.
हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक : २५/०८/२०२५

स्वाक्षरीत/-
**किशोर हरिश्चंद्र परकर**
४०१, नेहा ॲनेक्स्
भांडुप (प) मुंबई ४०००७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.सारस इन्फ्राटेक (भागीदारी संस्था), यांनी भुखंडधारक/परवानाधारक श्रीमती.महादीबाई उर्फ शेवंती अनंत म्हात्रे, यांच्याकडुन त्यांच्या मालकी हक्क/हिश्यातील, सिडकोच्या १२.५% योजनेअंतर्गत सिडको संचिका क्रमांक : उलवे-८६३ अन्वये मौजे. उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे सेक्टर - २२, भुखंड क्र. ७सी, मधील क्षेत्र १५० चौ.मी. क्षेत्राचे दिनांक :१६/०६/२०२५ रोजीच्या अंतरिम इरादापत्र संदर्भ क्रमांक: सिडको/भूमी/साटयो/उलवे/८६३/२०२५ नुसार इरादित करण्यात आलेला भुखंड हा भूखंडधारक यांनी आमच्या अशिलांना वर दर्शविलेले भुखंडधारक यांचेबरोबर विकासाचा करारनामा करुन विकसित करण्याचे ठरविले असून सदर भुखंडाच्या संपूर्ण क्षेत्रापैकी ५० टक्के म्हणजेच अंदाजे ७५ चौ.मी. क्षेत्राचे सिडकोची पुर्व परवानगी घेवून आमच्या अशिलांच्या लाभांत त्रिपक्षीय कराराने हस्तांतरण करण्याचे निश्चित केले आहे, तरीही या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, सदर कराराची पूर्तता/भुखंडाचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, उपरोक्त भुखंडावर अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एलएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवशक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदरहू भुखंडासंदर्भातील सिडकोची पूर्व परवानगी घेऊन व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे,

कळावे,
**सही : ॲड.अजित व्ही. सिंग (खरेदीदारासाठी)**
अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ता: १६/१७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे.
फोन नं. ०२२- ४००२६१४२
E-Mail ID - ajeet_advocate@yahoo.co.in
दिनांक : २२/०८/२०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे जांबरूग, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमीन मिळकत आमचे अशिल सौ. रीता अर्जुन सिंग यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री.लक्ष्मण महादू तांडेल, २)श्री.कृष्णा महायू तांडेल, ३) श्री.काशिनाथ महादू तांडेल यांच्याकडुन कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नांव | सर्व्हे नं. /हि.नं. | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| जांबरुग | २७ | ०.१४.२०<br>पोट खराबा ०.०१.५०<br>एकूण : ०.१५.७० | ०.९१ |

वरील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून, आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

नेरळ
ता.२४/०८/२०२५.

सही / -
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी, नेरळ (पू) ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८०८७४३०४४७

दिनांक-२३/०८/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-धोंडसे ता.सुधागड जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-धोंडसे ता.सुधागड जि.रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री अश्विन भाई शहा | १२/७ | ०-५७-०० | ०-२५ |
| | १२/५ | ०-५७-०० | ०-१२ |
| | ८८/२ | ०-६१-०० | ०-१२ |
| | ८७/१ | २-८७-०० | ०-८१ |
| | २७/४ | ०-३२-६० | ५-०० |
| | २७/२/अ | ०-३१-९० | ५-५९ |
| | २४/४ | १-६९-०० पैकी | ०-६६ |
| | | ०-८०-०० | ०-३७ |
| | २१/२ | २-२४-०० | ०-५० |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :-पाली-सुधागड
दिनांक -२३/०८/२०२५

सही /-
**श्री.राहुल जे.भंडारी**
ॲडव्होकेट
रा.पाली ता.सुधागड जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेणेचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे मापगांव, ता. अलिबाग येथील :-**

| मालकाचे नाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हेक्टर आर. चौरस मिटर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| रमेश दत्तात्रेय पाटील | २२७ | ०-५६-००<br>पैकी ०-२१-०० | ११.१५<br>पैकी ३.१४ |
| पुष्कर सुरेश पाटील<br>विजया सुरेश पाटील | २२७ | ०-५६-००<br>पैकी ०-१९-०० | ११.१५<br>पैकी ४.३५ |
| पंकज रविंद्रनाथ घरत | २२७ | ०-५६-००<br>पैकी ०-१६-०० | ११.१५<br>पैकी ३.६६ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- २३/०८/२०२५

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन, बँके शेजारी, महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

## ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे
## ता. खालापूर, जि. रायगड

जा.क्र. ३६२ — **ई-निविदा सूचना** — दिनांक : २१/०८/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे ता.खालापूर, जि.रायगड यांचे वतीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शासनाचे नोंदणीकृत ठेकेदार व पुरवठादार कडून तथा अनुभवी व इच्छुक ठेकेदार व पुरवठादारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यात ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. सदरची निविदा प्रक्रिया online पद्धतीने संगणकीय प्रणालीवर होईल. सदरची निविदेसंदर्भात सूचना आवश्यक असणारे साहित्य कागदपत्रे अटी व शर्ती, ई-निविदा कालावधी, तरतूद इ. माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निधी |
|---|---|---|---|
| १. | मौजे देवन्हावे येथील हनुमान मंदिरपासून ते नदी पर्यंत गटार तयार करणे. | ३१,३७,३६१/- | ग्रामनिधी |
| | ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. २२/०८/२०२५ ते दि. ०५/०९/२०२५ | |
| | ई-निविदा उघडणे | दि. ०६/०९/२०२५ | |

खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) https://wrd.maharashtra.gov.in
२) https://mahatenders.gov.in

आपले विश्वासू

**(प्रमोद नाना काळे)**
ग्रामपंचायत अधिकारी
**ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे**

**(रत्ना रोहिदास वाघमारे)**
सरपंच
**ग्रुप ग्रामपंचायत देवन्हावे**

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ सर्वप्रकारचे आजार, लठ्ठपणा, संतानप्राप्ती, व्यसनमुक्ती, विवाह/सोनेतारण बिनव्याजी/लाखस दर महा ५०००/- घरबसल्या पिढ्यांपिढ्या लाखो कमविण्याची डॉ.नथुराम शिहू (नागोठणा-पोयनाड) रायगड ७५०७१६६०१५

■ शिवानी पेट शॉप अलिबाग/चोंढी/पेण/तळोजा येथे कामाकरिता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६.

■ अलिबाग शहराच्या मध्यभागी २ बीएचके टेरेस फ्लॅट. एस.टी. स्टँड, कॅटामरन बस स्टॉप पासुन चालत ५ मिनटाचे अंतरावर सुसज्ञ, २ एसी सह. इन्व्हर्टर फिटींग, ईलेक्ट्रिक गीझर, किचन ट्रॉली व बऱ्याच सुविधा. त्वरा करा, अत्यंत मोक्याचे ठिकाण व सोयीसुविधांनी सुसज्ञ. संपर्क. ७८७५५५६०८१/ ९४२३३७७६०८/७७४१००२३०८

■ अलिबाग येथील ऑफिस कामाकरीता इंग्लिश व मराठी टायपिंग येणारी टायपिस्ट पाहिजे. मोबाईल नं. ९१४६६२४५१०. वेळ सकाळी १० ते ६

■ मालाडे, अलिबाग-रोहा या रस्त्यालगत (१५ एकर) ६०० गुंठे शेत जमीन रुपये तीन लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १२४ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२


■ श्रीगाव, अलिबाग येथे शेत जमीन २३० गुंठे, रुपये ४ लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक २७७ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

■ वरसोली, अलिबाग येथे शहरालगत १०० गुंठे शेत जमीन रुपये २० लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १७३ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन


१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## बोधकथा
## संत चोखामेळा



सातशे वर्षांपूर्वीचा महार शिक्षणाचा गंध नाही परंतु तो महान भगवत भक्त नामस्मरणाने स्वतःचे आगळे वेगळे स्थान पांडुरंगावरील निष्ठावंत भक्ती भाव देवावरील भोळाभाव संकटकाळी पांडुरंग त्याच्या मदतीला धावून येत असे. या चोखामेळ्यांनी कोणत्या साधनांनी श्री पांडुरंगाला आपलेसे केले होते संत चो खोबांचा अधिकार केवढा होता हे दाखवणारी गोष्ट मंगळवेढ्याचे गाव कुसू अकस्मात कोसळ ले आणि त्याखाली ३०/४० महार गाडले गेले. त्यामध्ये चोखोबा होते. काही दिवसानंतर ही बातमी पंढरपूरला नामदेवांना कळाली. संत नामदेवांनी चोखोबांची समाधी बांधायचे ठरविले. काही मंडळी चोखोबांच्या अस्थी आणण्यासाठी निघाली. तेव्हा एक मोठी अडचण निर्माण झाली. ३०/ ४० महार गाडले गेली असतील तर चोखोबांच्या अस्थी कोणत्या हे कसे ओळखायचे? तेव्हा संत नाम देव म्हणाले ज्या अस्थी च्या मधून विठ्ठल विठ्ठल असा नाद येईल त्याच अस्थी फक्त घ्यायच्या. त्याप्रमाणे मंगळवेढा जाऊन शोध घेता घेता त्यांना विठ्ठल विठ्ठल असा नाम घोष ज्या अस्थी मधून होत होता अशा अस्थी मिळाल्या. त्या आणून त्यावर चोखोबांयांची समाधी बांधली.

### सद्गुरू स्वामी बोध

संत चोखोबांच्या जवळ कोणतेही बौद्धिक नव्हते आणि विज्ञान देखील नव्हते. परंतु श्री पांडुरंगावरील त्यांची श्रद्धा एवढी अभंग होती की हरिनाम त्यांच्या रोमारोमात खेळत होते. ज्यांच्या जिभेवर हरिनामाचा नटनाच चालला होता अशा या महापुरुषाची महा वैष्णवांची तुलना कोणाबरोबर करता येणार नाही.

## पाली-खोपोली मार्गावर मोकाट गुर

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

**पाली-खोपोली मार्गावर रासळ येथे सद्यःस्थितीत मोठ्या प्रमाणात मोकाट गुरांचा सुळसुळाट असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. जणु काही या गुरांनी रस्त्यावर रास्ता रोको केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सद्यःस्थितीत पाली-खोपोली हा महामार्ग चांगल्या स्थितीत असल्यामुळे या मार्गावर वाहनांची वर्दळ पाहायला मिळत आहे. अशातच या मार्गावर वाढत्या मोकाट गुरांच्या संख्येमुळे वाहनचालकांना वाहन चालवतांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे.**



मोकाट गुरांच्या दिवसेंदिवस वाढत्या संख्येमुळे या गुरांना कोणी वाली आहे की नाही? ही गुरे रस्त्यावरती अशीच मोकाट सोडुन देण्यात आली आहेत की काय? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या मोकाट गुरांचे कळपच्या कळप रस्त्याच्या मध्येच उभे व ठाण मांडून बसलेले असतात. यांच्यामागे कोणीच गुराखी वगैरे दिसून येत नाही. तसेच वाहनचालकांना जाण्यासाठी रस्ताच मोकळा नसल्यामुळे गाडीचा हॉर्न वाजवूनसुद्धा गुरे बाजूला होत नाहीत. शेवटी वाहनचालकांना गाडी उभी करुन गाडीतून उतरुन गुरांना बाजूला करावे लागत आहेत.

रमोकाट गुरांच्या रस्त्याच्या मध्येच बरेच वेळा झुंज होत असतात. या झुंजीमुळे गाड्यांना अपघात होऊन गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहेत. जर का यामध्ये वाहनचालकांची चुकी नसताना एखाद्या गुराला जर धडक बसून अपघात झाला की लगेचच मोकाट सोडणार्या गुरांचे मालक त्याठिकाणी नुकसानभरपाईचा दावा करण्यासाठी पुढे सरसावत असतात. त्यामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात फिरणाऱ्यामोकाट गुरांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा, अशी मागणी वाहनचालकांतून होत आहे.



## तळ्यात शांतता समितीची बैठक

**। तळा । प्रतिनिधी ।**

आगामी सण शांततेत साजरे करावेत असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांनी तळावासीयांना केले. आगामी गणेशोत्सव व ईद सणांच्या पार्श्वभूमीवर तळा पोलीसांकडून आयोजित करण्यात आलेल्या शांतता समितीच्या बैठकीप्रसंगी ते बोलत होते. गणेशोत्सवासाठी चाकरमानी गावी दाखल होणार आहेत, अशावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी खबरदारी घेणे आवश्यक असून ज्या ठिकाणी वाद निर्माण होण्याची शक्यता आहे अशा ठिकाणच्या पोलीस पाटील यांनी याची कल्पना तळा पोलीस ठाण्यात द्यावी असे आवाहन केले. याप्रसंगी तहसीलदार स्वाती पाटील, पोलीस निरीक्षक सतीश गवई, चंद्रकांत रोडे, तळा नगरपंचायतीचे नगरसेवक, तालुक्यातील पोलीस पाटील यांसह तालुक्यातील नागरिक व व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हातमाग कापडाचे प्रदर्शन




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गौरी व गणपती सणानिमित्त सोलापूरच्या भाऊराया हॅण्डलूम यांचे हातमाग कापड भव्य प्रदर्शन व विक्री केंद्राचे उद्घाटन अलिबाग रायगड जिल्हा परिषद अधिकारी गायकवाड व सुरेश म्हात्रे तसेच जिल्हा परिषदचे सर्व अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रदर्शन व विक्री डोंगरे हॉल सार्वजनिक वाचनालय पोस्ट ऑफिस समोर अलिबाग २१ ऑगस्ट ते ११ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. हातमाग कापड प्रदर्शनाचा अलिबागवासियांनी लाभ घ्यावे असे आवाहन प्रदर्शनाचे प्रमुख पुरुषोत्तम पोतन यांनी केले. प्रदर्शनात कॉटन साडी, इरकल साडी, मधुराई साडी, खादी साडी, धारवाड साडी, मधूराई सिल्क साडी, सेमी पैठणी, खादी सिल्क साडी, प्रिंटेड ड्रेस, वर्क ड्रेस मटेरियल, पटोला ड्रेस, कॉटन परकर, टॉप पिस, सोलापूर चादर, बेडशीट, नॅपकिन, सतरंजी, पंचा, टॉवेल, वुलनचादर, दिवाण-सेट, प्रिंटेड बेडशीट, पिलो कव्हर, लुंगी, व शर्ट, कुर्ता, बंडी, गाहून, विविध प्रकारच्या विक्रीसाठी टेवण्यात आले आहे. सुती व खादी कापडाच्या विक्रीवर २० टक्के सुट ठेवण्यात आले आहे असे आयोजकांनी सांगितले आहे.

## अरुण काळोखेंच्या रांगोळीचा जागतिक विक्रम

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील पहूर गावचा रहिवाशी अरुण सुरेश काळोखे यांनी साकरलेल्या रांगोळीचा जागतिक विक्रम ठरला असून याची नोंद जागतिक बुकात झाली असून या यशाबद्दल अरुण काळोखे याचे विविध स्थरावरून अभिनंदन करण्यात येत आहे.

पहूर गावासारख्या दुर्गम भागात राहणाऱ्या अरुण सुरेश काळोखे याच्या आईवडिलांचे छत्र हरवले आहे, तरी त्यांनी न डगमगता आपल्या कला कौशल्यावर भर दिला असून अरुण यांनी रोहा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्यभिषेकाच्या समारंभाचे आयोजन ४ मार्च ते ७ मार्चपर्यंत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या आयोजित कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजयभिषेकाची प्रतिमा १,२६,००० चौरस फूट पसरलेल्या रांगोळीचा निर्मितीचा अरुण काळोखे साक्षीदार होता. १०० हुन अधिक कुशल कलाकारांनी ७० तास एकत्रितपणे करागिरीचे काटेकोरपणे नमुने आणि डिझाईन तयार करण्यासाठी समर्पित केले. सुमारे १०९ मानवी चित्रे आणि ३०,००० किलो रांगोळी रंगाचा वापर करणारा हा महत्वकांक्षी प्रकल्प केवळ जागतिक विक्रम प्रस्थापित करण्यासाठीच नाही तर आपली एकता, संस्कृती, आणि परंपरा यांचे प्रतिक म्हणून काम करत दूरवरच्या प्रेक्षकांना मोहित करण्याचा हेतू ही होता असे अरुण यांनी सांगितले आहे.

## विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप

**तळा :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या बालविकास मंदिरामधील विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आली. तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून गेले अनेक वर्ष बालविकास मंदिरमधील विद्यार्थ्यांना पाठय पुस्तकाचे वाटप मोफत करण्यात येत आहे असे विचार पुरुषोत्तम मुळे व प्रकाश गायकवाड यांनी व्यक्त केले. याप्रसंगी पुरुषोत्तम मुळे, चैताली तावडे, स्नेहल शिंदे, नूतन लोखंडे, विठ्ठल सुतार, प्रकाश गायकवाड, सचिन भाटे यांचेसह पालक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन भाटे यांनी केले.

## विद्यार्थ्यांची गणपती कारखान्यास भेट

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

गणपती बाप्पांचे आगमन अगदी चार दिवसांवर आले आहे. या बाप्पांची मूर्ती कशी तयार होते, याची माहिती जाणून घेण्यासाठी म्हसळ्यातील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेतील तिसरी व चौथीच्या चिमुकल्यानी शहरातील कुंभारआळी येथील गणपती कारखान्यास भेट देत मूर्ती कलेचे धडे जाणून घेतले.



शाळेतील विद्यार्थ्यांनी विद्याप्रवेश क्षेत्रभेट आणि कार्यानुभव विषयांतर्गत मातीच्या वस्तू बनवणे व उद्योगधंद्यांना भेट अंतर्गत पाभरेकर यांचा गणेशमूर्ती बनवण्याच्या कारखान्यास भेट दिली. यावेळी जितेंद्र पाभरेकर यांचाकडून विद्यार्थ्यांना गणेशमूर्ती तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल, रंग, मूर्ती तयार होण्यासाठी लागणारा कालावधी,उपलब्ध बाजारपेठ व एक मूर्ती तयार करण्याची प्रात्यक्षिक व तिचे रंगकाम करून दाखवत माहिती देण्यात आली. यावेळी संजय कर्णिक, शशिकांत शिर्के, दीपक मुंडे, इंदिरा चौधरी, साक्षी जंगम उपस्थीत होते.

# साप्ताहिक राशिभविष्य २४ ते ३० ऑगस्ट २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### वादाचे प्रसंग टाळा

**मेष :** राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून कोणतेही काम केल्यास बऱ्याच प्रमाणात यशस्वी होऊ शकाल. कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. अनाठायी खर्च करण्याचे टाळावे. कठीण परिस्थितीत हुशारीने, चतुराईने पुष्कळ गोष्टी साध्य करता येतील. कलाक्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. सामाजिक क्षेत्रात वाहवा मिळवू शकाल. कोर्ट व शेतीविषयक कामांना चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. शुभकार्याचे संकेत मिळतील. सरकारी नियम कटाक्षाने पाळा. आपण कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य दिल्यास आपणास चांगले समाधान मिळू शकेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. **महिलांना :** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका. **शुभ दिनांक :** २५,२६.

### आश्वासने देऊ नका

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण कोणालाही नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास हा सप्ताह सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल व वरिष्ठांची चांगले संबंध ठेवता येतील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. राजकीय क्षेत्रात आपले नाव होण्याची शक्यता राहील, मात्र आपल्या भावी योजनांबद्दल गुप्तता पाळणे हितकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा.विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतल्यास यशाची अपेक्षा ठेवू शकाल. या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपली कर्तव्ये काय आहेत याचा विचार करून त्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. येणाऱ्या प्रसंगांना धैर्याने सामोरे जा. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. **महिलांना :** मुलांचे प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः त्यांची खाण्याची पथ्ये सांभाळा व आपण कफ विकारांपासून सावध राहा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. **शुभ दिनांक:** २४,२५.

### बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता बोलण्यावर नियंत्रण ठेवा. इतरांची मने दुखावणार नाही, याची काळजी घ्या आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल. मोठ्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा. विरोधकांना न दुखवता आपले कार्य साध्य करा. कायद्याचे पालन करा. नियम व कायदे यांचे पालन करा खर्चाचे प्रमाण वाढणार आहे.घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे,आपण आपल्या हुशारीने व कौशल्याने आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न कराल व त्यात यशस्वी व्हाल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. काहींना विवाहाचे योगही संभवतात. नको त्या प्रलोभनात मात्र अडकू नका. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. **महिलांना :** विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. **शुभ दिनांक :** २६,२७.

### स्वतःकडे लक्ष द्या

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहताआपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. शेतीविषयक कामांना गती मिळेल आपल्या स्वभावातील हेकेखोरपणावर मात्र प्रतिबंध करा. थोड हट्टीपणा बाजूला ठेऊन जोडीदाराच्या मनाप्रमाणे वागा, घरातील वातावरण बदलून जाईल एखादे शुभ कार्य करण्याबाबत ठरवले जाईल. इतरांपेक्षा स्वतःकडे अधिक लक्ष द्या. आपल्या मनाला जे पटेल ते योग्य समजून वागणे योग्य ठरेल. आपल्या योजना स्वतःपुरत्या ठेवा. त्याची वाच्यता करू नका. आपले उद्दिष्ट पुढे ठेवून ते गाठण्याचा प्रयत्न करा. एक उद्दिष्ट ठेवून ते साधण्यासाठी प्रयत्नशील राहा. महिलांना त्यांच्या आवडीप्रमाणे कामे करता येतील.पहिले तीन दिवस प्रथम सत्रात प्रकृतीबाबत जागरूक राहावे. दंतविकार, उष्णतेचे विकार याकडे लक्ष द्या. **महिलांना :** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सत्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास व त्यानुसार कृती केल्यास आपला यशाचा मार्ग सुलभ होईल. कुटुंबातील आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभ दिनांक :** २९, ३०.

### व्यवसायात प्रगती होईल

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहताआपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे म्हणजे इतरांची नाराजी होणार नाही. त्याने घेत असलेल्या श्रमाचा योग्य परतावा मिळाल्याचे समाधान मिळू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा, उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. जोडीदाराची योग्य साथ मिळणार असल्याने एखादे मोठे काम करण्यास हरकत नाही, आपण आपल्या उद्योग-व्यवसाय क्षेत्रात काही बदल करणे महत्त्वाचे ठरणार आहे, पर्यायाने आपणावर येणाऱ्या आव्हानांना आपण सहजपणे सामोरे जाऊ शकाल. इतरांच्या मतांना जास्त महत्त्व न देता आपणास योग्य वाटणाऱ्या गोष्टींना प्राधान्य द्या. सरकारी नियमांचे पालन करा. विवाह इच्छुकांच्या आशा पल्लवित होतील. प्रलोभनांपासून दूर राहा. आपल्याला नोकरी-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. **महिलांना :** आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. **शुभ दिनांक :** २६,२८.

### रागावर नियंत्रण ठेवा

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहातकमी पैसे असले तरी हातातील संधी सोडू नका, आपल्या जिवलगा सोबत वेळ घालवण्याची संधी उपलब्ध होईल, योग्य त्या रीतीने त्याचा फायदा घ्या. नोकरदारवर्गाने मोठ्या मंडळी बरोबर गोड बोलून राहावे, जुन्या समस्या व चिंता मिटणार आहेत. अंमवशा दिवशी श्वानाला खाण्यास द्या.घरात एखादे मंगल कार्य होणार आहे त्याची तयारी करावी लागेल. आपल्या परिश्रमाचे योग्य फळ मिळणार आहे. नवीन नोकरी असणाऱ्याना वातावरण चांगले भेटणार आहे. कुटुंबात एखाद्या चांगल्या कार्याचा योग आखला जाईल. जास्त तेलकट पदार्थ खाऊ नका त्रास होऊ शकतो. कलाक्षेत्राला उत्तम हा कालावधी उत्तम असून, पितरांनचे स्मरण करणे म्हत्वाचे आहे. महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळणारा कालावधी आहे, एखादा सत्कार ही होण्याचा संभव आहे. प्रवासाचे योग संभवतात. **महिलांना :** आपल्या रागावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **शुभ दिनांक :** २९, ३०.

### अनावश्यक खर्च टाळा

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहातआपण आपल्या दैनंदिन जीवनात अनावश्यक खर्च करण्याचे टाळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. नोकरदारांना बराचसा दिलासा मिळेल. आपण आपल्या चातुर्याचा उपयोग केल्यास उत्तम. व्यापार-उद्योगाला चांगला प्रतिसाद मिळेल व प्रगती करता येईल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल व हाती घेतलेल्या कामात परिश्रमाने यश संपादन करता येईल. प्रकृतीची पथ्ये पाळा. मौल्यवान वस्तू सांभाळा. प्रवासात सावधानता बाळगा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. या सप्ताहात शांतता व संयम बाळगणे आवश्यक. आपल्या कार्यकौशल्याचा कस लागेल. विरोधकांवर कडक नजर ठेवा. त्यांना संधी देऊ नका. कुणालाही नाराज करू नकानोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. **महिलांना :** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. **शुभ दिनांक :** २४,२५.

### कामात दगदग वाढेल

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. साहसी कृत्ये कटाक्षाने टाळावीत. विरोधकांच्या हालचालींवर कडक नजर ठेवावी, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात यशाची अपेक्षा ठेवू शकाल. अंमवशा दिवशी पितरांनची आठवण काढा. जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. आरोगयाबाबत हलगर्जीपणा करू नका, जिवलगाकडून भेटवस्तु मिळेल. प्रकृतीची काळजी घेणे गरजेचे राहील आठवड्याच्या शेवटी स्थिति सामान्य होणार आहे, तो पर्यन्त दम धरणे क्रम प्राप्त राहील, घराबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात कोर्ट कचेरी ही होऊ शकते. कामात दगदग वाढणार आहे. स्थावर मालमत्तेची कामे करताना विचारपूर्वक करावीत. हातचे सोडून पळत्याच्या पाठी जाऊ नका, कामकाज नसलेल्याना अचानक काम हाती येणार आहे त्यामुळे हाती पैसा खेळू शकेल. **महिलांना :** आपण सामंजस ठेवल्यास ही वेळ आपल्यासाठी संधि देणारी असेल, आपल्या ओळखीचा फायदा कसा करायचा ही ठरवा बाकी सर्व सोप होईल. **शुभ दिनांक :** २६,२७

### कामांना गती मिळेल

**धनु :** राशीसाठी आपण सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा आशा-अपेक्षा पुर्ण होऊ शकतील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढविल्यास अपेक्षित यश प्राप्त होऊ शकेल. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत. राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कोर्टदरबारच्या कामांना गती मिळेल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. **महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक :** २८,२९.

### व्यवहारात सावधगिरी बाळगा

**मकर :** हा साप्ताह मकरराशीसाठी ग्रहमान पाहता कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागणे स्वीकारल्यास आपणास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आर्थिक बाबतीत मात्र तज्ञांचा सल्ला घेऊनच व्यवहार करणे योग्य राहील. आप्तेष्ट, मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. आपण सर्व बाबतीत गोड बोलून आपले कार्य साध्य करण्याचे धोरण स्वीकारल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल, मात्र आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोणाशीही नाराजी पत्करू नका. मुलांकडे अधिक लक्ष दिल्यास उत्तम. त्यांच्या अध्ययनात आपले सहकार्य द्या. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा.अपेक्षित गोस्टी साध्य करता येईल. कामात उस्ताह राहील, गुरुची कृपा अनुभवण्यास मिळेल. **महिलांना :** बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत.आपण आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. आपण प्रकृतीस्वास्थ्यासाठी तेलकट व मसालेदार पदार्थांचे सेवन टाळल्यास प्रकृतीच्या तक्रारी उद्भवणार नाहीत. **शुभ दिनांक :** २७.२८.

### ज्येष्ठांचा आदर राखा

**कुंभ :** राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहतामनातिल वाईट विचारांना दूर सारा. एकाग्रता वाढवण्यासाठी ध्यान करा. आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. नातलगात व मित्रमंडळींत उधार-उसनवारी टाळणे हितकारक राहू शकेल. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता बाळगा. व्यापारात प्रगती होण्यासाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग केल्यास उत्तम. मुलांना प्रगती करता येणे शक्य होईल. प्रवासात मात्र सावधानता बाळगा, किमती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा. आपल्या कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल आणि आपल्या ध्येयाजवळ जाता येणे शक्य होईल. व्यवसायाला चालना मिळेल. आप्तेष्ट, मित्रमंडळींच्या गाठीभेटीचे योग संभवतात. **महिलांना :** सर्वांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. नियमित व्यायाम व योगाचा अवलंब करावा. दम लागे पर्यंत काम करू नका. ज्येष्ठांचा आदर राखा. नको त्या प्रलोभनांना भुलू नका, सरळ मार्ग अवलंबा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. धार्मिक गोष्टींना प्राधान्य द्याल. **शुभ दिनांक :**२८,२९.

### कामात लक्ष द्या

राशीसाठीआपले एकूण ग्रहमान पाहता आपल्या पुष्कळशा समस्या या सप्ताहात सुटण्याची शक्यता आहे. मात्र त्या दृष्टीने आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. कामात अधिक लक्ष द्या. सरकारी नियमांचे पालन करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः छाती, पोट, डोळे यांच्या विकारांपासून सावध राहा. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे अथवा संपर्काचे योग संभवतात. विरोधकांची धास्ती बाळगू नका. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. आपणास ग्रहांची अनुकूलता लाभणार असल्याने आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. काही नव्या जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना चांगला काळ राहील. निकाल आपल्या बाजूने लागेल. **महिलांना :** मुलांना अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. जागेसंबंधीच्या प्रश्नांना चालना मिळेल. घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही. **शुभ दिनांक :** २६, ३०.



# गणेशोत्सव

## समज देणारा समाजोत्सव!




> इंग्रजांचा अत्याचार आणि बेबंदशाहीला विरोध करणारे हुंकार या गणेशोत्सवातून निर्माण व्हायला लागले. संघटन, विचार प्रबोधन, अत्याचाराविरोधी लढणारी चेतना त्यासाठी लागणारी मानसिक उर्जा या सगळ्यांमुळे गणेशोत्सव समाजकारणाचे अभिन्न अंग झाले होते. गणेशोत्सवला कारण करुन राजकारण करणाऱ्यांना आपल्या अडचणींची जाणीव करुन द्यायला हवी आहे. गणेशोत्सव मूळ हेतूपासून दुरावला गेला तो आजमिनीपर्यंत. या उत्सवाला एका विशिष्ट प्रकारचा दिखावूपणा आला. हा दिखावूपणा गणेशोत्सवाचा मूळ उद्देशाला मारक ठरला आहे.

आपण समाजप्रिय उत्सवप्रिय आहोत आणि त्यामुळेच गणेशोत्सव साजरा करतो. हा गणेशोत्सव खऱ्या अर्थाने समाजोत्सव आहे. हिंदू घरांघरांमध्ये गणपतीचे पार्थिवपूजन गणेश उत्सव साजरा करण्याची प्रथा परंपरा वर्षोनुवर्षे शतको न शतके चालू आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या गणेश उत्सवाचे स्वरुप घरगुती होते. व्यक्तीगत कौटुंबिक स्तरावर होते. गणरायाची पूजा अर्चा कुटुंबाच्या देव्हाऱ्यात माजघरात साग्रसंगीत होत होती. गणेश महिमा वाचन स्तवन गायन सुद्धा होत होती. छत्रपती शिवाजी महाराज, अनेक मराठा सरदारनंतर पेशवे सुद्धा यांनी वेळोवेळी लक्ष घालून गणपती देवस्थानांचे संवर्धन आणि देखभाल केली आहे.

परकीय आक्रमण आणि मुघल काळात देवस्थानांना रक्षण पुरविले गेले आहे. इंग्रजांचा कारभार अंमल सुरु झाला. इंग्रजाचे अत्याचार सुरु झाल्यानंतर त्याच्याविरुद्ध लढा सुरु केला. या उठाव करणाऱ्यांना लढा निर्माण करणाऱ्यांना संघटीत होणे गरजेचे होते. आणि त्यामुळेच १८८३ साली सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात लोकमान्य टिळकांनी केली. घराघरांत विराजमान असलेले गणपतीबाप्पा आता सार्वजनिक झाले होते. या गणेशोत्सवाचे सार्वजनिकरण झाल्यामुळे पुजाअर्चा, सार्वजनिक होणारे कार्यक्रम,व्याख्याने, सभा, कुस्त्यांचे फड, पोवाडे गायन इत्यादीमुळे समाजमन संघटीत होऊ लागले, जाहीर व्याख्यान कार्यक्रम भाषणे यामुळे जनजागृती मोठ्या प्रमाणावर सुरु झाली. करमणूक आणि प्रसारमाध्यमांचा अभाव होता. त्यामुळे तरुणमित्र या उत्सवाकडे संघटीत होत गेली. इंग्रजांचा अत्याचार आणि बेबंदशाहीला विरोध करणारे हुंकार या गणेशोत्सवातून निर्माण व्हायला लागले. संघटन, विचार प्रबोधन, अत्याचाराविरोधी लढणारी चेतना त्यासाठी लागणारी मानसिक उर्जा या सगळ्यांमुळे गणेशोत्सव समाजकारणाचे अभिन्न अंग झाले होते.

स्वातंत्र्योत्तर काळात हा गणेशोत्सव मूळ हेतूपासून दुरावला गेला तो आजमिनीपर्यंत. या उत्सवाला एका विशिष्ट प्रकारचा दिखावूपणा आला.

हा दिखावूपणा गणेशोत्सवाचा मूळ उद्देशाला मारक ठरला आहे. गणेशोत्सवाची सुरुवात इंग्रजाविरोधी उठावासाठी होती. इंग्रजांची राजवट नाही, परकियांचे राज्य नाही. परंतु अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार गलिच्छ राजकारण याचा अतिरेक झाला आहे. स्वकिय जरी हे करीत असले तरी त्यासाठी विरोध करणारे संगठन आवश्यक आहे. फरक इतकाच आहे की इंग्रजांविरोधी म्हणून गणेशोत्सवाचे संगठन झाले. आता स्वकीय भ्रष्ट राजकारणी यांना जाब विचारण्यासाठी हे संघटन आवश्यक आहे.

या गणेशोत्सवाचा उद्देश आणि परंपरा यांना काही अशी अपवाद वगळता तिलांजली देण्यात आली आहे. दिखावूपणा, सवंग गोष्टींचा वापर करुन आमचीच दिवाळखोरी आम्ही मांडत आहोत. गणेशोत्सवाचा सार्वजनिक आधार घेऊन एखाद्या पक्षाचा कार्यकर्ता पुढे येतो. दहा-बारा रिकामटेकडे कार्यकर्ते वर्गणीच्या नावाखाली वसुली चालू करतो. कर्णकर्कश्य भोंगे, थिल्लर संगीत यांच्या आधारे करमणुकीचा डंका वाजवतांना दिसून येतो. स्वातंत्र्यानंतर सुद्धा सामाजिक, बांधिलकी जपणाऱ्या अनेक उत्सव मंडळातून गणपती बाप्पांच्या भोवती देखावे रचले जात. या देखाव्यातून आणि पर्यायाने गणेश उत्सवातून सामाजिक भान, परंपरा, इतिहास, संस्कृती याचा प्रचार, प्रसार केला जात होता. काही काळासाठी तो गणेशोत्सव मंडळातून व्यवस्थित पार पाडला जात होता. आता अभावानेच दिसतो आहे.

आपले उत्सव, समारंभ या सगळ्यांच्या बाबतीत राजकारणाचा शिरकाव झालेला दिसतो आहे. उत्सवासाठी एकत्र येणारी जनशक्ती, संगठन राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांना संधी वाटते आहे. शहरांत गल्लीगल्लीत गावांत, वाड्या पाड्यात राजकीय पक्ष पुरस्कृत दहीहंडी उत्सव, गणेशोत्सव आकाराला येत आहेत. उत्सवात सहभागी होणाऱ्यांना सणांतून निर्माण होणाऱ्या निर्भेळ आनंदाला सामान्य पारखे होत चालले आहेत. कोणत्या उत्सव मंडळाची मूर्ती मोठी, कोणत्या मंडळाचा देखावा मोठा, यात स्पर्धा सुरु झाली आहे. उत्सव मंडळाची वर्गणी गोळा करणाऱ्यांमध्ये, स्वत:चा रिकामटेकडा वेळ उत्सवाच्या नावाखाली घालणारा कार्यकर्ता म्हणून राजकीय पक्षाकडून गौरविला जातो. खऱ्या अर्थाने ही तरुण उर्जा गंडविली जाते. पण हे सांगणारी माध्यमे फक्त थेट प्रक्षेपणात गुंतली आहेत.प्रत्येक उत्सव सण आनंददायी, उल्हासदायी असतात, असायला पाहिजे. राजकारण्यांनी हे संगठन आपल्या राजकीय भूमिका मांडायला कारणी सुद्धा घालावी. गणेश उत्सव हा एक कोकणासारख्या भागात उत्साहात उन्मादात, श्रद्धेने साजरा केला जातो. घरांघरांत गणपती असतो.

चाकरमानी आवर्जुन कोकणांत गणेशोत्सव साजरा करतो. जनमनाची जनभावनेची कदर राजकारण्यांनी करावी ही माफक अपेक्षा असणे हे चुक नाही ना? पण या कोकणातल्या रस्त्यांची काय वाताहत राज्यकर्त्यांनी केली आहे. या रस्त्याच्या दुर्दशेचा रजत महोत्सव साजरा करायला हवा आहे. राज्यकर्ते विकासकामांचा गवगवा करीत आहेत पण कोकणातल्या प्रवाश्यांची दुर्दशा दूर करीत नाही. एसटी महामंडळा महाराष्ट्र शासन उपक्रम आहे. गणेशोत्सवात अमक्या नमक्या संख्याची वाढ गाड्यांमध्ये केली आहे असे जाहीर प्रचार करतांत पण त्या गाड्या ज्या रस्त्यावरुन धावतात त्याची स्थिती काय आहे? याची संवेदनात्मक जाणीव राजकारण्यांना नाही. कोकणच्या गणपती उत्सवाबाबत सर्वांना माहित आहे. मग राज्यकर्त्यांना नको का? कोकणातल्या जिल्ह्यातले पालकमंत्रीपद हवे म्हणून अहमिका लागते मग या रस्त्यांच्या सुधारणेचे, प्रवाशांच्या, जनतेच्या सुखसुविधा अत्यावश्यक आहेत याचे पालकत्व कोणालाच घ्यायचे नाही. राज्यात असणाऱ्या मंदिरांना जोडणारा शक्तीपीठ मार्ग हजारो करोडो रुपये टाकून करायचा आहे. पण घरांघरात मंदिरे, अनेक पुरातन मंदिरे आहेत त्यांना दर्शनाला जाणारा कोकण महामार्ग, राज्यकर्ते दुर्लक्षित आहेत. या अशा पद्धतीचे राज्यकर्त्यांचे वागणे क्लेशदायक आहे. गणेश, गणपती ही नावे खरं तर लोकनायकांची आहेत. गणांचा इश, गणांचा पती असा अर्थ सांगणाऱ्या देवांचा उत्सव, क्लेशदायक होऊ नये यासाठी राजकारण करणारा जननायक गेली पंचवीस वर्ष समोरच येत नाही.

उत्सवाच्या ओढीने गणपती दर्शनासाठी जाणाऱ्या भक्त जनांना रस्त्यांवरच्या खड्यांखड्यांतूनच प्रवास करावा लागतो आहे. या साठी खरंतर आता लढा द्यावा लागणार आहे का? इंग्रजांच्या अत्याचाराला बळी पडणाऱ्यांनी संगठन करुन गणेशोत्सव विचारमंच बनवला होता. याच गणेशोत्सवला कारण करुन राजकारण करणाऱ्यांना आपल्या अडचणींची जाणीव करुन द्यायला हवी आहे. जनतेच्या हालअपेष्टा वाढवणाचा स्वकल्याणासाठी भ्रष्टाचारी वृत्ती ठेवणाऱ्या राज्यकर्त्यांना एसटी महामंडळाच्या गाड्या वाढविण्यापेक्षा रो रो जलवाहतूक सुरु करण्याबरोबर कोकणात जाणारे महामार्ग वीस पंचवीस वर्ष सुरळीत होत नाही हे निक्षून सांगण्याची वेळ आली आहे. जनप्रक्षोभ काय असू शकेल याची जाणीव करुन समज देणारा हा गणेशोत्सव ठरावा हीच गणपती चरणी प्रार्थना! गणपती बाप्पा मोरया! **

# हरताळका हरतालिका पूजन..एक स्त्री प्रधान सण

**धनंजय शेटये**

कालपरवा माझ्या मुलीने प्रश्न विचारला,

''पप्पा हरताळका म्हणजे काय हो?'' आजच्या पिढीला आपल्या परंपरागत रुढीनुसार चालत आलेल्या संस्कृतीचं दर्शन घडविताना सण उत्सवाचा कार्यकारणभाव समजावून सांगणे गरजे आहे. तरच आजच्या पिढीला कोकणातील सण उत्सवांचे आकर्षण निर्माण होईल.आमच्या लहानपणी हरताळका सणांच्या दिवशी मामा आईसाठी भरपूर शहाळी घेऊन यायचा. भाऊ बहिणीसाठी उपासासाठी फक्त आणि फक्त शहाळीच आणण्याची अनोखी परंपरा रितीरिवाज होता.खरंतर आई आणखी गावातील इतर सर्वच स्त्रियांचा निर्जल असा कडक उपवास असतो. प्रत्येकाच्या घरी भरपूर शहाळी आलेली दिसायची. आज माझ्या मुलीला हरताळका पुजनाची सविस्तर माहिती करुन दिली.कोकणातील लोकजीवन हे निसर्गाशी, देवभक्तीशी आणि पारंपरिक श्रद्धांशी अगदी घट्ट जोडलेलं आहे. कोकणात विशेषतः कोकणप्रांतातील स्त्रिया हरताळका या व्रताला फार मोठं महत्त्व देतात. ही परंपरा एक धार्मिक विधी असली तरी त्या स्त्रीशक्तीचं, भक्तीचं आणि सामूहिक एकतेचे प्रतिक मानले जाते.

कोकणातल्या घरात देवघरात ही पूजा केली जाते.

संपूर्ण घर सजवलं जातं.

पूजा सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळेस केली जाते.

स्त्रिया संपूर्ण दिवस निराहार किंवा फलाहार करतात. काहीजणी फक्त तुळशीपान किंवा पाणी घेतात.

हे व्रत केवळ धार्मिक कार्य न राहता स्त्रियांमधील एकता, सहकार्य आणि सामाजिक संवाद वाढवणारा कार्यक्रम ठरतो.

या काळात पावसाळी हरित निसर्ग आणि मातीचा सुगंध हरताळकेच्या पूजनात आणखी भक्तिभाव भरतो.

शिव-पार्वतीच्या प्रेमाचं प्रतीक असलेलं हे पूजन कोकण पट्टयात फारच आदरपूर्वक आणि पारंपरिक पद्धतीनं केलं जातं.

कोकणच्या पारंपरिक संस्कृतीमध्ये हरताळका पूजन ही केवळ धार्मिक परंपरा नाही, तर ती आहे स्त्रीच्या भक्ती, निष्ठा आणि श्रद्धेची अभिव्यक्ती. पार्वतीप्रमाणेच आपल्या संसारात शांती,



प्रेम आणि सातत्य असावं, यासाठी ही साधना केली जाते.

भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील तृतीया म्हणजेच हरतालिका तृतीयाहिंदू स्त्रियांसाठी अत्यंत महत्त्वाचा, भक्तिभावाने भरलेला सण. मुख्यतः विवाहित आणि अविवाहित स्त्रिया या दिवशी देवी पार्वतीचं व्रत करत असतात. सौभाग्य, पतीस दीर्घायुष्य आणि उत्तम जीवनसाथीसाठी हे व्रत मोठ्या श्रद्धेने पाळले जाते.

**हरतालिका म्हणजे काय?**

हर म्हणजे भगवान शिव आणि आलिका म्हणजे सखी किंवा मैत्रीण.

हरतालिका या शब्दाचा अर्थ असा होतो की, पार्वतीची सखी तिला विवाहासाठी पित्यापासून दूर घेऊन गेली. शंकराशी विवाह व्हावा म्हणून पार्वतीने जंगलात जाऊन कठोर तपश्चर्या केली. त्या दिवशी तिने अन्न-जलत्याग करून उपवास केला होता. त्यामुळे हा दिवस हरतालिका या नावाने ओळखला जातो.

देवी पार्वतीने पूर्वजन्मी हिमालयपुत्री म्हणून जन्म घेतला होता. तिने बालपणापासूनच भगवान शंकराला पती म्हणून स्वीकारले होते. तिच्या वडिलांनी मात्र तिला श्रीविष्णूशी विवाह लावून देण्याचा निर्णय घेतला. हे ऐकताच तिच्या सखीने तिला जंगलात नेले. पार्वतीने तिथे कठोर व्रत, उपवास व तप करून भगवान शंकराला प्रसन्न केले. अखेर शिवशंकरांनी तिचे तप स्वीकारले आणि विवाह केला.

निराहार उपवास हे दिवसाचे खरे वैशिष्ट्य आहे.या दिवशी स्त्रिया अन्न-जल त्याग करून उपवास करतात. काही ठिकाणी फळे वा फक्त पाणी घेणे चालते.

मृण्मयी मूर्ती पूजन केले जाते. शंकर-पार्वतीची मातीची मूर्ती घडवून पूजन केले जाते. पूजनासाठी आंब्याची पाने, बेलपत्र, फुलं, सुपारी, फळं, फुले, पंचामृत, आणि औक्षणाचे साहित्य लागते. पूजन झाल्यावर हरतालिकेची व्रतकथा ऐकली जाते. त्या देवीच्या निष्ठेचे आणि संकल्पाचे वर्णन असते. काही भागात रात्र जागरण केले जाते . काही भागांत स्त्रिया रात्रभर जागून शिव-पार्वतीची भजनं म्हणतात.

अनेक स्त्रिया हे व्रत करतात.

विवाहित स्त्रियापतीच्या दीर्घायुष्यासाठी हे व्रत करतात.

अविवाहित मुलीसद्गुणी व पवित्र जीवनसाथीसाठी.

कुमारी कन्या देखील हे व्रत करण्यास पात्र असते

हरतालिका हे फक्त धार्मिक कर्मकांड न राहता नारीच्या इच्छाशक्तीचे प्रतीक बनले आहे. उपवास, पूजन, संयम, श्रद्धा या गोष्टींचं स्त्रीच्या जीवनातलं स्थान अधोरेखित करते. एकूणच हे व्रत प्रेम, समर्पण, भक्ती आणि साधनेसाठी एक आदर्श उदाहरण ठरतं. हरतालिका व्रत हे केवळ धार्मिक अनुष्ठान नसून, पार्वतीसारख्या संकल्पशक्ती आणि धैर्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवण्याचा दिवस आहे. यामध्ये निस्सीम श्रद्धा, प्रामाणिक तप आणि स्त्रीच्या मनोबलाचा गौरव आहे. **

# स्त्री पुरुष एक नातं

**निलेश साठे**

मुलगी बहीण मैत्रीण पती आई मावशी सासू आजी पणजी आत्या मामी काकी अशी अनेक कितीतरी प्रकारचे नाती एका मुलीला निभवावी लागतात. अर्थात मुलांना सुद्धा समांतर अशी नाती आहेतच. पण आपल्याकडे मुलीला लक्ष्मीचे रूप मानले जाते. पण याच लक्ष्मीला वासनांधतेने ओरबडले जाते तिचे लचके तोडले जातात तेव्हा समाजाची नक्की मानसिकता कुठली असते. आज कुठलीही स्त्री स्वतःच्या घरात सुद्धा सुरक्षित राहिलेली नाही. मागील काही वर्षापासून आपल्या देशामध्ये मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटना घडत आलेल्या आहेत. कित्येक नवरा बायकोच्या नात्याला तर तडे कधीच गेलेले आपण पाहत आहोत. पण काही वासनांध नराधमांनी छोट्या छोट्या मुलींना सुद्धा आपले लक्ष बनवले आहे. सध्याची परिस्थिती पाहता भुकेने व्याकुळ झालेले वाघच जणू दुनियेत फिरत आहेत. कधी त्यांच्या हातामध्ये एखाद्या सशाचे पिल्लू सापडतय आणि कधी आपण त्याला चेलमोडतोय अशी त्यांची भयान मानसिक परिस्थिती झालेली आहे. बरं बाहेर ते बाहेर घरातले सुद्धा आता हैवणासारखे वागू लागले आहेत. कधी बाप आपल्या पोटच्या मुलीवर वाईट नजर ठेवून आहे. तर कधी चुलता कधी मामा. कित्येक भावांनी आपल्या बहिणीला भक्ष बनविल्याचे वाचायला ऐकायला मिळते. नक्की माणसाला झालंय तरी काय.

अशी विकृत मनस्थिती असलेले लोक मोबाईल मध्ये काहीतरी पाहतात आणि उत्तेजित झाल्यावर मिळेल तिथे मिळेल तसा चौका मारू पाहतात. मग समोरचं नातं गोतं पार विसरून जातात. अधाशासारखे तुटून पडतात. आणि हातून नको ते कृत्य होऊन बसते. जेव्हा भानावर येतात तेव्हा पश्चातापाशिवाय त्यांच्याकडे दुसरा कुठलाही मार्ग नसतो. पण काही हरामखोर आणि नालायक माणसं अशीही या जगामध्ये आहेत त्यांना पश्चाताप सुद्धा होत नाही. उलट त्या गोष्टीची त्यांना आणखीनच सवय लागते आणि ते कृत्य पुन्हा पुन्हा करू पाहतात. ज्यांच्या सोबत अघोरी कृत्य करत असतात त्यांचे वय त्यांचे नाते त्यांची मानसिकता कशाचा कशाचा म्हणून विचार करत नाहीत. अंगात राक्षस



संचारल्या प्रमाणे फक्त ते कृती करत असतात. मागील काही घटना लक्षात घेता अतिशय मनसुन्न होऊन जाते. माणूस म्हणून जन्माला आलेल्या ची लाज वाटते. या अघोरी कृतीची माणसे जगामध्ये कुठल्या कोपऱ्यामध्ये कोणाची कधी कुठे वाट पाहत असतील याचा काहीही नेम राहिलेला नाही. हे संधी साधू संधीची वाटच पाहत असतात मिळाला मोका की मार चौका. ही विकृती एवढी रसातळाला गेली आहे की मुलं मुलांना सुद्धा सोडत नाहीत. कोणत्या प्रकारच्या समाजामध्ये आपण जगतो आहोत. घरामध्ये मुली सुरक्षित नाहीत. विद्या मंदिरामध्ये मुली सुरक्षित राहिलेल्या नाहीत. मंदिरामध्ये सुद्धा सुरक्षितता राहीलेली नाही.

केवळ आणि केवळ उपभोगावर मनुष्य तुटून पडला आहे.अशीच कृती जर पुन्हा पुन्हा होत राहिली आणि या प्रकारावर बंधने लादता नाही आली तर या जगामध्ये केवळ स्त्री आणि पुरुष एवढेच एक नातं उरेल. केवळ नर आणि मादी. जनावराप्रमाणे मनुष्य दिसेल तेव्हा दिसेल तिथे चौका मारत सुटेल. मग ताई माई अक्का सगळी नाती मागे राहतील. आणि मग फक्त टपाटप टपा टप टपा टप.

या गोष्टी रोखण्यासाठी माणूस म्हणून आपण खरंच काही करू शकणार नाही का. **

# ग्रामगीता : ग्राम पर्यावरणाचे प्रबोधन

**विठ्ठल वळसे**

महाराष्ट्राला संतसाहित्याची मोठी परंपरा लाभली आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, बुवाबाजीने जखडलेल्या परंपरातून शोषित समाज्याला व स्त्रीला मुक्त करण्याचा प्रयत्न संतांनी केला. प्रसंगी समाज कंटकाकडून विरोध सहन केला. याच परंपरेतील संत म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होय, त्यांनी लिहिलेल्या ग्रामगीता मधून स्वच्छता, ग्रामविकास, जलव्यवस्थापन, निसर्ग पर्यावरण, प्रदूषण, वृक्षारोपण, गोवंश सुधार, शेती विकास, स्त्री स्वातंत्र्य व सामाजिक जीवनातील मोठा विचार, विकास, संकल्प मांडला. तुकडोजी महाराज हे बहुआयामी व्यक्तिमत्व ते क्रांतिकारी देशभक्त, साहित्यिक, लोकशिक्षक, प्रवचनकार, कीर्तनकार, शिक्षणतज्ञ, तत्वज्ञ, विचारवंत व जनसेवेला ईश्वर सेवा मानणारे आधुनिक संत होत. ग्राम जीवनाचा ग्राम उन्नतीचा मूलमंत्र त्यांनी ग्रामगीता या ग्रंथातून मंडला. आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करताना त्यांनी कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून अज्ञान व अंधश्रद्धेत अडकलेल्या जनसामान्यांना बाहेर काढण्याचा प्रयत केला. त्यांनी सामाजिक व निसर्ग पर्यावरणाचा संकल्प मांडला. यातून त्यांचा युगदृष्टेपणा आज अंगीकारणे गरजेचे आहे.

संत तुकडोजी महाराज ग्राम उन्नतीचा मार्ग सांगताना गावच्या स्वच्छतेचे महत्व जनसामान्यांना देतात. गावातील रोगराई नष्ट व्हावी गाव सुंदर व्हावे यासाठी ग्रामगीतेतून सांगतात.

**मी समजतो गावहि शरीर, त्यास राखावे नेहमी पवित्र।**
**त्यानेच नांदेल सर्वत्र आनंद गावी॥**

तुकडोजी महाराज गावाला शरीराची उपमा देतात. गावसुद्धा हे एक शरीर आहे. ते पवित्र ठेवले तर त्याने गावात आनंद राहील. प्रत्येकाने गावाला आपल्या शरीराप्रमाणे समजले तर जशी शरीराची निगा आपण राखतो, ते स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा प्रयत्न करतो. तसा प्रयत्न गावासाठी केला पाहिजे. आज गावात ग्रामपंचायत व नगरपालिकेचे स्वच्छता सेवक आहेत. कचरा गाडी कचरा जमा करत फिरत असते, तरी गावात इतरत्र कचरा, घाण दिसत असते. यासाठी शहर व गाव हे आपली शरीराचे अवयव आहेत असे समजून कार्य केल्यास तिथे उन्नती झाल्याशिवाय राहणार नाही.

**मिळोनि करावी ग्रामसफाई ।**
**नाली, मोरी ठायी ठायी ।**
**हस्ते परहस्ते साफ सर्वहि ।**
**चहूकडे मार्ग ॥**
**त्यां जी जी निघेल घाण ।**
**ती दूर न्यावी गांवापासून ।**
**अस्ताव्यस्त न देता फेकून ।**
**नीट व्यवस्था लावावी ॥**

गाव आपले शरीर समजून सर्वांनी गावची साफ सफाई करुन नाली, मोरी जागोजागी स्वच्छता करावी. सर्वांनी सर्वमार्ग स्वच्छ केले पाहिजेत. यातून जी घाण, कचरा जमा होईल तो गावापासून दूर नेला पाहिजे व त्याची विल्हेवाट व्यवस्थित लावली पाहिजे. आज गाव व शहरात बंदिस्त गटारे असली तरी ती पावसाळ्यात तुंबतात. तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे कचरा विल्हेवाट लावणे आज शहर व गावाला मोठे जिकरीचे काम झाले आहे. त्यासाठी कचरा वर्गवारी व कचऱ्यावर असलेले खत प्रकल्प गावोगावी उभे राहणे गरजेचे आहे. हीच अपेक्षा तुकडोजीला महाराजांना व्यक्त केली आहे.

गांवचे मार्ग विष्टेने व्यापले ।
आड कोने घाणींनी भरले ।
ठायी ठायी उकिरडे साचले । गांव वेढले गोदरींनी ॥

गावचे रस्ते, जागेचे कोणे कोपरे सुद्धा घाण विष्टेने रंगलेले, ठिकठिकाणी उकिरडे साचले आहेत. यामुळे गाव गोदरी झाले आहे. यावर महाराज पुढे म्हणतात पडक्या गढी साफ न केल्याने तिथे साप, विंचू वास्तव करत असतात. वाटेत काटे कुटे,गोठ्यांचे मल मूत्र रस्त्यावर येत आहे. नादुरुस्त विहिरी आजूबाजूला सर्वत्र घाण पासरली आहे. यावर ते थेट म्हणतात गावचे पुढारी झोपले आहेत का ? अशा गोष्टीतून खत निर्मिती सुचवतात.

**गांव असो अथवा शहर । तेथील बिघडले आचारविचार ।**
**म्हणोनीच रोगराईने बेजांर । जाहले सारे जन लोक ॥**

लोकांचे आचार विचार बिघडले तर गावात रोगराई माजेल. केवळ गावच्या स्वच्छतेच्या व्यवस्थेवर अवलंबून राहता आपलेही कर्तव्य समजून गावच्या सुरक्षेसाठी हातभार लावला पाहिजे.

गाव व्हावया निरोगी, सुंदर । सुधारावे लागेल एकेक घर।
आणि त्याहूनहि घरात राहणार ।
करावा लागेल आदर्श ॥


आपले गावाप्रती आचार विचार चांगले ठेवले.

रोगराई निर्मुलन करायचे असेल, गावची सुधारणा विकास करायचा असेल तर स्वतः पासून स्वतःच्या घरापासून सुधारावे लागेल. **

# "लोकशाहीच्या गळ्यातील साखळदंड"

लोकशाहीला पक्षांतर बंदी कायद्याने स्थैर्याची काठी दिली, पण त्याच काठीने प्रतिनिधींच्या विचारांचा पाठ मोडला. आज संसदेत आवाज नाही, फक्त आदेशांची प्रतिध्वनी आहे. प्रश्न असा की आपण लोकशाही जगवत आहोत की तिच्या शवपेटीत टाळ्या वाजवत आहोत?

भारतीय लोकशाहीचे सौंदर्य हे निवडणुकांत नाही, तर निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या विचारमंथनात आहे. संसद आणि विधानसभांचा आत्मा म्हणजे वादविवाद. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांच्या दडपशाहीतही भारतीय नेत्यांनी वैचारिक शस्त्रांनी राजकीय रणांगण गाजवले. संविधान सभेत नेहरूंच्या आदर्शवादाला पटेलांची व्यावहारिक बुद्धी भिडली, आंबेडकरांच्या तर्काला श्यामाप्रसाद मुखर्जींचे कठोर प्रश्न भिडले. मतभिन्नतेची ठिणगी तेव्हाच लोकशाहीच्या दीपामध्ये प्रकाश बनून झळकत होती. पण आजचे चित्र उभे केले तर त्या दीपात केवळ धुराडा दिसतो. कारण विचारांचा प्रकाश विझला आहे आणि त्याऐवजी पक्षशिस्तीचा दंडुका डोक्यावर बसला आहे.



या अवस्थेला जबाबदार ठरतो तो १९८५ मध्ये जन्माला आलेला पक्षांतर बंदी कायदा. १९६७ नंतरची "आया राम, गया राम" परंपरा पाहता हा कायदा आला हे समजण्यासारखे आहे. सत्ता ही बाजारात विक्रीस ठेवलेले माल वाटू लागला होता, आणि आमदार-खासदारांची निष्ठा ही पावसाच्या ढगांसारखी क्षणभंगुर होती. सरकारे पडत होती, घसरत होती, पुन्हा उभी राहत होती. अशा काळात पक्षांतर बंदी कायद्याने स्थैर्य आणले, हा त्याचा सकारात्मक पैलू आहे. पण ही शिस्त जशी कडक होत गेली, तशी ती लोकशाहीच्या गळ्यातील साखळदंड बनू लागली.

खासदार-आमदारांचे पहिले कर्तव्य कोणते मतदारसंघाचा आवाज की पक्षनेत्याचा आदेश? उत्तर आज ठळक आहे. पक्षनेत्याचा आदेश. व्हीपने काय सांगितले तेच सत्य. आपल्या विवेकाने बोलायचे नाही, मतदारांच्या हितासाठी पक्षाविरुद्ध उभे राहायचे नाही, आणि चर्चेत स्वतंत्र विचार मांडायचे तर दूरच. लोकशाहीत प्रतिनिधी म्हणजे जनतेचा आवाज असावा, पण आज तो आवाज म्यूट बटण दाबून बंद केल्यासारखा झाला आहे. संसदेत चर्चा केवळ नाटक ठरते. भूमिका आधीच पक्षाच्या कार्यकारिणीत लिहिलेली असते, सभागृहात ती फक्त वाचून दाखवायची. अशा वेळी वादविवाद ही प्रक्रिया नसून औपचारिकता ठरते.

संसद ही एकेकाळी विचारांचे कुरुक्षेत्र होती. तिथे मतमतांतरांची गाठभेट व्हायची, कुणाचे विचार पराभूत व्हायचे, कुणाचे विजयश्री पताका फडकवायचे. आजचे दृश्य म्हणजे शस्त्रविरहित रणांगण. घोषणाबाजीचे गजर, वॉकआउटचे नाट्य आणि लोकांच्या डोळ्यांत धुरळा उडवणारे दृश्य. आचार्य अत्रे यांनी एकदा लिहिले होते, "सिंहाच्या पिल्लांना मेंढ्यांच्या कळपात टाकले की ती पिलं मेंढरे होतात." आजचे खासदार-आमदार हेच वाघाची पिल्लं; पण पक्षशिस्तीच्या कळपात अडकून मेंढरे झाले आहेत.

**प्रतिक कोळी**

> **भारतामध्ये लोकशाही शासनप्रणाली बऱ्याच काळापासून अस्तित्वात आहे. राजेशाही जरी होती तरी गावपातळीवर गावातील पंचायत गावाच्या शासनासंबंधी सर्व निर्णय घेत असे. राजाची जबाबदारी मुखत्वे संरक्षण व दोन किंवा अधिक गांवामधील तंट्याबाबत असे. सध्याची व्यवस्था पश्चिमी देशाकडून घेतली आहे. या त्रुटी दूर करून लोकशाही व्यवस्था अधिक कार्यक्षम बनवणे आवश्यक आहे.**

पक्षांतर बंदी कायदा दोषी आहेच, पण केवळ तोच नाही. तीव्र पक्षीय ध्रुवीकरणामुळे चर्चेची परंपरा नष्ट झाली आहे. आज बहुतेक सदस्यांसाठी संसदीय भाषण म्हणजे वृत्तवाहिन्यांवरील झटपट झळकपाच सेकंदांच्या 'साउंड बाईट्स'. अभ्यास, सखोल माहिती, समित्यांतील काम यासाठी कुणाकडे वेळ नाही. संसदीय समित्यांची उपेक्षा होत आहे; तिथे जेव्हा खरे तपास व्हायचे, तेव्हा धोरणांना बळ मिळायचे. पण आता ती समिती केवळ अहवाल छापण्यापुरती मर्यादित झाली आहे.

यातून लोकशाहीची अधोगती सुरू झाली आहे. चर्चा म्हणजे आत्मा, आणि आज हा आत्माच मृत्यूशय्येवर आहे. "लोकशाही म्हणजे वादसंस्कृती" हे टिळकांचे वाक्य आज किती उपरोधिक वाटते! कारण वाद नव्हे, तर पक्षाच्या हुकुमावर टाळ्या वाजवणे एवढेच उरले आहे.

मग उपाय काय? सर्वप्रथम पक्षांतर बंदी कायद्याचा आवाका मर्यादित करावा लागेल. हा कायदा फक्त विश्वासदर्शक ठराव आणि अर्थसंकल्पीय मतदानापुरता ठेवला पाहिजे. इतर विषयांवर प्रतिनिधींना स्वातंत्र्य द्यायला हवे. तेव्हाच त्यांचा आवाज खरा लोकशाहीचा आवाज बनेल. दुसरे म्हणजे संसदीय समित्यांना नवे दात द्यावे लागतील, तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागेल, आणि अभ्यासावर भर द्यावा लागेल. सदस्यांना संशोधन सहाय्य हवे, जेणेकरून चर्चा माहितीपूर्ण व दर्जेदार होईल. तसेच सभागृहातील गोंधळ थांबवण्यासाठी आचारसंहिता कडकपणे लागू करावी लागेल.


पक्षशिस्त आवश्यक आहे, पण ती जर प्रतिनिधींच्या विचारांना गळा घालणारी ठरत असेल, तर ती शिस्त नव्हे, ती गुलामी आहे. पक्षांतर बंदी कायद्याने स्थैर्य दिले, पण त्याचवेळी चर्चा गुदमरवली. लोकशाहीला जर पुन्हा वैचारिक तेज द्यायचे असेल, तर हा कायदा फेरविचारला गेला पाहिजे. अन्यथा संसद आणि विधानसभांमध्ये आपण फक्त बाहुल्यांचे नाटक पाहत राहू.

आज भारतीय लोकशाही जगाला आदर्श म्हणून उभी राहावी असे आपल्याला वाटते. पण जगाला आदर्श तेव्हाच दिसेल, जेव्हा आपल्या सभागृहांमध्ये चर्चा जिवंत राहील, मतभिन्नतेला वाव मिळेल आणि विचारांचा दीप पुन्हा प्रज्वलित होईल. अन्यथा इतिहास आपल्यालाच विचारेल "तुमच्या लोकशाहीत लोक होते की फक्त व्हीपची सावली?" **

# असेच काहीतरी...

असेच काहीतरी... हे रमेश धनावडे यांचे वेगळ्या प्रकारचे पॉकेट बुक - खिसा पुस्तक - स्वरूपाच्या आकारातील पुस्तक पेणच्या साहित्य संपदा प्रकाशनने प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला ज्येष्ठ साहित्यिक उमाजी म. केळुस्कर यांची काव्यमय स्वरूपाची प्रस्तावना लाभली आहे. त्यांच्या मते, रमेश धनावडे यांनी दोन ओळींच्या काव्यातून ब्रम्हांड निर्माण केले आहे. शेवटी ते लिहितात,

'जीवनाचं सारं तत्वज्ञान, मर्म, संघर्ष, विरोधाभास, मिश्किलपणा, विनोद, उपहास, राजकारण, समाजकारण, आरोग्य हे सारं काही या पुस्तकातून पुढे येते.' रमेश यांनी आपले 'मनोगत' सविस्तरपणे मांडले आहे. त्यांच्या मते 'असंच काहीतरी...' मध्ये कविता नाहीत, त्या चारोळ्या तर मुळीच नाहीत! सायकल चालवण्याच्या वेडातून, दीर्घ अंतर कापताना हा काव्यप्रकार सुचल्याचे रमेश यांनी नोंदविले आहे. या पुस्तकात एकूण १०५ दुरोळी कविता समाविष्ट आहेत. या पुस्तकाचे आकर्षक आणि रंगीत मुखपृष्ठ मनोमय मीडियाचे आहे.




मानवी मनात दिवसभरात अनेक प्रकारचे विचार येत असतात. सामान्यपणे प्रत्येक माणसाच्या मनात दर दिवशी पन्नास ते सत्तरहजार विचार येतात असे संशोधन सांगते. अर्थात व्यक्तीव्यक्तीनुसर ही संख्या कमी जास्त होऊ शकते, असेही आधुनिक मेंदू विज्ञान सांगते. प्रत्येक व्यक्तीच्या मनात येणारे हे विचार विविध प्रकारचे असतात. आपल्याला विचार करण्याची उत्तम संधी निवांतपणातच लाभते. रमेश यांच्या या दोन ओळींच्या काव्यातून असेच, अनेक प्रकारचे विविध विचार व्यक्त होत आहेत.

प्रौढपणी भावी काळात येणारे, नकोसे वाटणारे वार्धक्य जाणवत असते. त्यावेळी वाटते,

हा कधी जाईल हे वाटणं
वाट्याला येऊ नये,
मग ते पाहुणेपण असो किंवा
वार्धक्य...०१

जीवन मार्गावर चालताना वाटते,
आधी खाल खस्ता, तर
आयुष्यात सोपा होईल रस्ता...०३

'ध्येय' गाठण्याच्या मार्गात अडथळे येतात, तशीच आकर्षणेही,

आधी 'ध्येय' गाठलं पाहिजे हे समजतं, पण समोर 'पेय' दिसल्यावर नाईलाज होतो!...०५

परिणामी अनेकांचे ध्येय एवढ्याशा या 'पेय' मध्येच बुडून जाते!!

पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्ष लागवड महत्त्वाची, पण बहुतेकांना त्या ऐवजी आपल्या दारात पैशाचे झाड लावण्याची इच्छा असते.

मीही एक झाड लावावं म्हणतोय,
पण पैशाचं रोप कुठेही मिळत नाही...१२

तत्त्व आणि व्यवहार नेहमी जमतेच असे नाही, त्यामुळे काय होते पहा,

चायनीज वस्तूंवर दिवसभर बहिष्कार टाकून,
तो संध्याकाळी चायनीजमध्ये गेला..२१

कपड्यांवरील डाग आणि चारित्र्यावरील डाग वेगळे असतात.

वॉशिंग मशीन मधून काढल्यावर डाग धुतले जातात पण आयुष्यातील डागांसाठी अशी मशीन नसते...२९ व्यायामाचे महत्त्व कळते पण...

मग असे होते!

मी आज चालायला जाणार होतो,
पण गाडीच पंक्चर झालीय!..३०

कधी त्यावरचा उपायही असतो.. अर्थात तोही वैचारिकच.

गाडीचा टायर झिजण्यापेक्षा
चप्पल झिजलेली केव्हाही चांगलं...३२

सध्याच्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे प्रमाण वाढत आहे. त्यावर सोपा उपायही माहीत असतो,

घरातली साखर कमी करा
नाहीतर रक्तातील साखर वाढेल!..३८

जीवन समजण्यासाठी हे समजायला हवेच.

तो अनेक वर्ष जगला याचं जगाला सोयर सुतक नसतं,
तो 'गाणे' गात जगला की 'रडगाणे' हे महत्त्वाचं!..४७

मानवी मनाची व्याप्ती आणि भरारी हे एक न उलगडणारे कोडेच आहे. त्यावेळी कवीला वाटते,

आकाशगंगा व्यापून उरेल
एवढी मनाची व्याप्ती हवी!...८१

रमेश धनावडे यांच्या विविध दुरोळी वाचनीय, प्रेरक आणि अंतर्मुख करतात. हे सारे वाचून अशाच प्रकारचे काव्य करण्याची स्फूर्ती काहींना मिळू शकेल, हेच या पॉकेटबुकचे आणि कवीचे यश ठरू शकेल. पुस्तकात रमेश धनावडे यांचा सचित्र परिचय करून दिला आहे. **

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७

**पुस्तकाचे नाव : असेच काहीतरी...**
**लेखक, कवी : रमेश धनावडे**
**९७६६३२३४५७**
**प्रकाशक : साहित्यसंपदा प्रकाशन, पेण प्रथम**
**आवृत्ती : १ मे २०२५ पृष्ठे : १२३.**
**स्वागतमूल्य : रु.२००/-**

# शहरांचे पर्यावरणीय आरोग्य ढासळतेय...

**बदलत्या हवामानाचा परिणाम शहरांवर मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे शहरातील कथित सामान्य सुरक्षित जीवन सातत्याने बाधित होत आहे. आजघडीला कधी शहरे पाण्याने तुंबतात, तर कधी पाण्याच्या टंचाईचा सामना करतात. शहरांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचा प्रश्न गंभीर असतो. शहरांच्या पायाभूत सुविधांवर भर देताना त्यांचे पर्यावरणही जपले पाहिजे, तरच शहरातील नागरिकांचे जीवन सुसह्य होईल.**

**मिलिंद बेंडाळे**

पावसाळा काही प्रमाणात अशांतता आणतो; परंतु ही अस्थिरता ही एक नवी सामान्य बाब बनत आहे, जी बदलत्या हवामानाचे लक्षण आहे. आपली शहरे वाढता वीज वापर, पाण्याची मागणी आणि बिघडत्या सार्वजनिक पायाभूत सुविधांशी झुंजत आहेत. ऊर्जा आणि पाणी प्रणालींवर दबाव आणत आहेत. कमी होत जाणारी हिरवळ, गायब होणारे तलाव, तुंबलेले नैसर्गिक नाले आणि खराब कचरा व्यवस्थापन या सर्वांमुळे मुसळधार पावसात शहरात पूर येतो आणि उष्णतेच्या लाटेत पाण्याची टंचाई निर्माण होते. या पार्श्वभूमीवर काही शहरांमध्ये झालेले काम इतरांना निश्चितच प्रेरणा देणारे आहे. निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांमध्ये नैसर्गिक किंवा मानवनिर्मित हिरवीगार जागा आणि पाणवठ्यांचा समावेश आहे. त्याचे अनेक फायदे आहेत. 'तलावांचे शहर' उदयपूर हे हिरव्या आणि पाण्याच्या एकात्मिक पायाभूत सुविधा काय करू शकते याचे एक उत्तम उदाहरण आहे. पावसाळ्यात, रामसर वेटलँड सिटी म्हणून ओळखले जाणारे उदयपूरचे तलाव वनस्पती आणि जलजन्य प्राण्यांनी भरलेले असतात. ते पावसाचे पाणी साठवतात. पृष्ठभागावरील प्रवाह कमी करतात. भूजल पुनर्भरण करतात. पर्यावरण थंड करतात आणि जवळच्या मोठ्या तलावांमधून येणारे पाणी शोषून घेतात. अशा पायाभूत सुविधा टिकवून ठेवण्यासाठी आणि हवामान आणि पाण्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी लवचिकता निर्माण करण्यासाठी भारतीय शहरांनी तीन प्रमुख उपायांवर कृती केली पाहिजे.

पहिले म्हणजे शहराच्या मास्टर प्लॅनमध्ये हिरव्या आणि निळ्या जागांचा समावेश केला पाहिजे. त्याचा विकास सामान्यतः २० वर्षांसाठी केला जातो. बेकायदेशीर भू-वापर बदलाविरुद्ध स्पष्ट कायदेशीर तरतुदी असायला हव्यात. शहरी अधिकाऱ्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की दीर्घकालीनदृष्ट्या ही नैसर्गिक संपत्ती जलसुरक्षा आणि पूर तसेच उच्च तापमान कमी करण्यासाठी महत्त्वाची आहे. पाणथळ जागा (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम, २०१७ असूनही त्यात सर्व भारतीय राज्यांमध्ये पाणथळ जागा प्राधिकरणांची निर्मिती आणि संवर्धनासाठी निवडलेल्या पाणथळ जागा अधिसूचित करण्याची तरतूद आहे, तरीही केवळ गोवा, उत्तर प्रदेश आणि राजस्थानने या दिशेने प्रगती केली आहे. त्याचप्रमाणे २०२७ पर्यंत एक हजार शहरी जंगले विकसित करण्याचे उद्दिष्ट असलेल्या नगर वन योजनेची अंमलबजावणी वेगात केली पाहिजे. दुसरे म्हणजे शहरांनी घरगुती सांडपाण्याचा पुनर्वापर व्यवस्थापित करण्यासाठी आणि वाढवण्यासाठी विशेष योजना तयार केल्या पाहिजेत. अशा योजना स्थानिक जलाशय, तलाव तसेच जमिनीसारख्या शहरी जलस्रोतांचे सांडपाणी प्रदूषणापासून संरक्षण करू शकतात. त्यामुळे परिसंस्था त्यांच्या आवश्यक सेवा प्रभावीपणे प्रदान करू शकतात.



ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेने (सीईईडब्ल्यू) केलेल्या एका अभ्यासात असे सुचवण्यात आले आहे, की एका मजबूत योजनेत पाण्याचे संतुलन आणि गुणवत्ता मूल्यांकन, पिण्यायोग्य नसलेल्या पाण्याच्या उद्देशांसाठी (जसे की लँडस्केप विकास, बांधकाम, रस्त्यावरील स्वच्छता, अग्निशमन केंद्रे, सार्वजनिक स्वच्छता सुविधा) पुनर्वापराचे पर्याय ओळखणे, पुनर्वापरासाठी व्यावहारिक लक्ष्ये निश्चित करणे, प्रक्रिया केलेल्या वापरलेल्या पाण्यासाठी वाटप यंत्रणा परिभाषित करणे आणि अंमलबजावणीसाठी संस्थात्मक रचना तयार करणे यांचा समावेश असावा. शहरांनी निळ्या आणि हिरव्या पायाभूत सुविधांच्या बांधकाम आणि देखभालीसाठी स्थिर वित्तपुरवठा आणि नागरिकांचा सहभाग सुनिश्चित केला पाहिजे. इंदूर आणि अहमदाबादमध्ये महानगरपालिका रोखे आणि राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियानांतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधण्यासाठी वापरले जाणारे हायब्रिड वार्षिकी मॉडेल काय शक्य आहे ते दर्शवतात. सामान्यतः वनीकरणासाठी वापरल्या जाणाऱ्या राष्ट्रीय भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण (सीएएमपीए) निधीचा वापर विद्यमान शहरी जंगले आणि हरित कॉरिडॉरचे संरक्षण करण्यासाठी केला पाहिजे. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित पायाभूत सुविधांचे संचालन आणि देखभाल यासारख्या क्रियाकलापांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे. पाणीपुरवठा, कचरा संकलन आणि विल्हेवाट आणि उद्याने आणि इतर हिरव्या जागांची देखभाल यासारख्या सेवांचा खर्च भागवण्यासाठी वापरकर्ता शुल्क आकारले पाहिजे. कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी अनुदाने सुरूच ठेवली पाहिजेत; परंतु शहरांनी नागरी जबाबदारीची मागणी करण्यास मागेपुढे पाहू नये. विकसित देशांमधील कोणतेही शहर सार्वजनिक सहभाग न घेता लवचिक पायाभूत सुविधा उभारू शकलेले नाही. भारतीय शहरे विकास, रोजगार आणि समृद्धीचे चालक आहेत; परंतु त्यांना हवामान धोक्यांचाही सामना करावा लागत आहे. आपण शहरांचे पर्यावरणीय पाया (तलावे, जंगले आणि ड्रेनेज सिस्टम)मध्ये गुंतवणूक करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचे भविष्य धोक्यात आणू. गेल्या काही दशकांमध्ये भारताने जलद शहरीकरण पाहिले आहे. भारतातील शहरांची वाढ मोठ्या प्रमाणात अनियोजित आहे. त्यामुळे अनेक आव्हाने आणि शहरी अराजकता निर्माण झाली आहे. अनियोजित शहरी वाढीचा सर्वात विनाशकारी परिणाम म्हणजे विद्यमान पायाभूत सुविधांवर दबाव. पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधांना वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. परिणामी, पायाभूत सुविधांवर जास्त ताण येतो. तो त्याच्या रहिवाशांच्या गरजा पूर्ण करण्यात अपयशी ठरतो. यामुळे गर्दी, अपुरी सेवा आणि जीवनमान कमी होते. अनियोजित शहरी विकासामुळे वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. मर्यादित रस्ते जाळे आणि वाहनांच्या संख्येत अनियंत्रित वाढ यामुळे अनेक शहरांमध्ये प्रवास हा रोजचा संघर्ष बनला आहे. वाहतूक कोंडीमुळे केवळ मौल्यवान वेळ वाया जात नाही, तर इंधनाचा वापर, पर्यावरण प्रदूषण आणि आरोग्याचे धोकेदेखील वाढतात. व्यापक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसल्यामुळे ही समस्या आणखी वाढते. ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत. यामुळे परवडणाऱ्या घरांच्या पर्यायांची तीव्र कमतरता निर्माण झाली आहे. परिणामी, विविध शहरी भागात झोपडपट्ट्या आणि अनौपचारिक वस्त्या उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे राहणीमान आणि सामाजिक असमानता कमी होत आहे.

याखेरीज, योग्य नियोजनाचा अभाव अनेकदा मौल्यवान जमिनीवर अतिक्रमणाला कारण बनतो. त्यामुळे गृहनिर्माण संकट आणि शहरी गरिबी वाढते. भारतातील अनियोजित शहरी विकासामुळे पर्यावरणाचे नुकसान झाले आहे. लोक अनेकदा वनजमिनीवर अतिक्रमण करतात. त्यामुळे जैवविविधतेचे नुकसान होते आणि परिसंस्थेमध्ये व्यत्यय येतो. अनियंत्रित बांधकाम, अयोग्य कचरा व्यवस्थापन आणि अनियंत्रित औद्योगिकीकरण प्रदूषण मातीची धूप आणि पाण्याची कमतरता निर्माण करते. शहरांची अनियोजित वाढ सामाजिक असमानता वाढवते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी शाश्वत शहरी नियोजन, पायाभूत सुविधा विकास आणि सामाजिक कल्याण कार्यक्रमांना एकत्रित करणारा बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे.

व्यापक शहरी नियोजनात गुंतवणूक करून, परवडणाऱ्या घरांना प्राधान्य देऊन, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून आणि शाश्वत पद्धतींचा अवलंब करून आपण शहरांना चैतन्यशील, राहण्यायोग्य ठिकाणी रूपांतरित करू शकतो. महानगरांमध्ये मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. कधी कधी मुसळधार पाऊस प्राणघातक ठरू शकतो. पावसाळ्यात मुंबई, चेन्नई आणि बंगळुरूसारख्या शहरांमधील रस्ते पाण्याखाली जातात आणि सामान्य लोकांना अडचणींना तोंड द्यावे लागते. भारतीय शहरांमध्ये दर पावसाळ्यात पूर येणे सामान्य आहे. जलद शहरीकरणामुळे, शहरातील तलाव गायब होत असून नाले कचऱ्याने भरले आहेत.

अलिकडच्या वर्षांमध्ये अशा पुरांपूर्वी दिल्ली आणि बेंगळुरूमध्ये पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली. तिथे पाणी साठवण्याच्या जागा कमी झाल्या आहेत. या वर्षी पावसाळ्यापूर्वी बंगळुरूमध्ये असे पाणी संकट निर्माण झाले, की लोकांना आवश्यक कामांसाठी खासगी टँकरमधून जास्त किमतीत पाणी खरेदी करावे लागले. जून महिन्यात देशाची राजधानी दिल्लीमध्येही अशीच परिस्थिती दिसून आली. जूनमध्ये कडक उन्हामुळे पाण्याचे संकट इतके बिकट झाले की लोकांना पाण्यासाठी रांगेत उभे राहावे लागले. बंगळुरूप्रमाणेच दिल्लीतील लोकांनाही पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावे लागले. या परिस्थितीचा विचार करून शहरांच्या पर्यावरणीय संतुलनाचे नियोजन केले, तर काहीसा दिलासा मिळू शकतो.

# निवडक

## शुबमन गिलला विश्रांती

**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा स्टार फलंदाज आणि टेस्ट संघाचा कर्णधार शुबमन गिल याच्याबाबत मोठी बातमी समोर आली आहे. शुबमन गिल सध्या आजारी आहेत आणि घरी विश्रांती घेत आहेत. त्यामुळे कदाचित ते मैदानावर खेळण्यासाठी उतरू शकणार नाहीत. याच कारणामुळे गिल या आठवड्यापासून बंगळुरूमध्ये सुरू होणाऱ्या दुलीप ट्रॉफीत भाग घेऊ शकणार नाहीत. बीसीसीआयने दुलीप ट्रॉफीसाठी नॉर्थ झोन संघाची घोषणा करताना शुबमन गिल यांची कर्णधार म्हणून नियुक्ती केली होती. मात्र, त्यांच्या तब्येतीमुळे व्यवस्थापनाला बदल करावा लागला. गिल बाहेर झाल्यानंतर आता त्यांच्या जागी अंकित कुमार संघाचे नेतृत्व करतील. तसेच, निवड समितीने आधीच गिलच्या बॅकअप म्हणून शुभम रोहिल्ला यांना संघात सामील केले होते.गिल बाहेर झाल्याने नॉर्थ झोनला मोठा धक्का बसला आहे. आता संघाचा विश्वास उपकर्णधार अंकित कुमारवर असेल, तर शुबमन गिल मात्र फिट होऊन आशिया कपमध्ये भारतीय संघासाठी दमदार पुनरागमन करण्यावर लक्ष केंद्रित करतील.



## निकोलस साल्दान्हा यांचे निधन

**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी क्रिकेटपटू निकोलस साल्दान्हा यांचे पुण्यात वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्र क्रिकेटच्या एका युगाचा अंत झाला आहे. देशांतर्गत प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये महाराष्ट्रासाठी निकोलस साल्दान्हा यांनी उल्लेखनीय कामगिरी केली होती. निकोलस साल्दान्हा हे उजव्या हाताचे फलंदाज होते. फलंदाजीसह ते फिरकी गोलंदाजी देखील करत. स्थानिक क्रिकेटमध्ये त्यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्त्व केले होते. एकूण कारकीर्दीमध्ये निकोलस साल्दान्हा यांनी ५७ प्रथम श्रेणी सामने खेळले. या सामन्यांमध्ये ३० च्या सरासरीने २,०६६ धावा केल्या. २२.४८ च्या प्रभावी सरासरीने १३८ बळी घेतले होते. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन म्हणजेच एमसीएने निकोलस साल्दान्हा यांना श्रद्धांजली वाहिली. एमसीएने साल्दान्हा यांना आमच्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक म्हणून संबोधले. मनिकोलस साल्दान्हा हे एक समर्पित आणि प्रतिभावान क्रिकेटपटू होते. त्यांनी महाराष्ट्रासाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. मैदानावरील कामगिरीने आणि खेळाप्रती असलेल्या वचनबद्धतेने त्यांनी सर्वांवर ठसा उमटवला होता. त्यांना भारताकडून खेळायची संधी मिळाली नाही, पण त्यांनी महाराष्ट्राच्या संघाला एकट्याने अनेक सामने जिंकवून दिले. साल्दान्हा हे त्यांच्या लेग ब्रेक गुगलीसाठी प्रसिद्ध होते.



## आफ्रिकेने मालिकाही जिंकली

**नवी दिल्ली :**आपल्या घरात सगळेच वाघ असतात असे म्हणतात. पण याच वाघाला घरात घुसून धोबीपछाड देणं येरागबाळ्याचं काम नाही. चोकर्सचा धप्पा लागलेल्या दक्षिण आफ्रिका संघाने हा करिश्मा केलाय. मायदेशातील वनडे मालिकेत बलाढ्य ऑस्ट्रेलियाला दक्षिण आफ्रिका संघाने धूळ चारली आहे. या मालिकेतील सलग दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला लोळवलं आहे. ऑस्ट्रेलिया संघाला मायदेशात पराभवाला सामोरे जावं लागलं. कर्णधार पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क, स्टीव्ह स्मिथ आणि ग्लेन मॅक्सवेल यांच्याशिवाय ऑस्ट्रेलियाचा संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मैदानात उतरला. पण वनडे मालिकेच्या दोन्ही सामन्यांत पराभूत व्हावं लागलं. मॅक्केमध्ये खेळल्या गेलेल्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं पुन्हा एकतर्फी सामना जिंकला. यजमान ऑस्ट्रेलियाला ८४ धावांनी पराभूत केले. या विजयासह दक्षिण आफ्रिकेनं तीन सामन्यांची वनडे मालिका जिंकली. ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका या दोन संघांमध्ये काही दिवसांपूर्वीच टी २० मालिका झाली. त्यात दक्षिण आफ्रिकेला २-१ ने पराभूत केले होते. पण वनडे मालिकेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध मोठे आव्हान होते. कारण कर्णधार पॅट कमिन्स आणि स्टार्कसारख्या दिग्गज खेळाडूंना या मालिकेत विश्रांती दिली होती. तर स्टीव्ह स्मिथ आणि मॅक्सवेलसारख्या स्टार फलंदाजांनी या फॉरमॅटमधून काही महिन्यांआधीच निवृत्ती घेतली होती. स्टब्स-ब्रेट्ज्केचे शतक हुकले या वनडे मालिकेच्या पहिल्या सामन्यात ९८ धावांनी विजय मिळवणाऱ्या दक्षिण आफ्रिका संघानं दुसऱ्या सामन्यातही जबरदस्त खेळ केला. पण या सामन्याची सुरुवात हवी तशी झाली नव्हती. अवघ्या २३ धावांवर सलामीवीर माघारी परतले होते. त्यानंतर मॅथ्यू ब्रेट्ज्के आणि स्टब्ज यांनी डाव सावरला. दोघांनी मोठी भागीदारी केली. दोघांनी अर्धशतके केली, पण मोठी खेळी करण्यात अपयशी ठरले. टोनी डिजोर्जीने ३८ धावा केल्या. तसेच अखेरच्या फलंदाजांनीही योगदान दिले. त्या जोरावर दक्षिण आफ्रिका संघाने २७७ धावांपर्यंत मजल मारली. ऑस्ट्रेलियाच्या अ‍ॅडम झॅम्पाने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या.

## गॉफ-स्विटेक एकाच गटात

**न्यूयॉर्क :** न्यूयॉर्कमध्ये होणाऱ्या २०२५ च्या यूएस ओपन टेनिस स्पर्धेसाठी महिला एकेरीचा ड्रॉ गुरुवारी जाहीर करण्यात आला. गतविजेत्या सबालेन्का हिला यावेळी तिचे जेतेपद राखण्यासाठी कठीण आव्हानाला सामोरे जावे लागू शकते कारण तिचा ड्रॉ खूपच कठीण दिसत आहे. गेल्या वर्षी, सबालेंकाने अंतिम फेरीत अमेरिकन जेसिका पेगुलाला हरवून तिचे पहिले यूएस ओपन जेतेपद जिंकले. यासह, ती आठ वर्षांत एकाच हंगामात हार्ड-कोर्ट ग्रँड स्लॅम दोन्ही जिंकणारी पहिली महिला ठरली. सबालेंकाला स्पर्धेत दुसरे मानांकन देण्यात आले. बेलारूसी सबालेन्काला स्पर्धेत दुसरे मानांकन देण्यात आले आहे. ती तिच्या जेतेपदाच्या बचावाची सुरुवात स्पेनच्या रेबेका मासारोवाविरुद्ध करेल. तिसऱ्या फेरीत, तिचा सामना २०२१ च्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या लेला फर्नांडिसशी होऊ शकतो, जी अलीकडेच सिटी ओपनमध्ये विजेती बनली आहे आणि तिला ३१ वे मानांकन मिळाले आहे.



# वर्ल्ड कप स्पर्धेच्या वेळापत्रकात बदल

## डी.वाय.पाटीलवर फायनलसह होणार पाच सामने

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसीने भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या आगामी महिला क्रिकेट वर्ल्ड कप स्पर्धेचे सुधारित वेळापत्रक शुक्रवारी जाहीर केले. एम. चिन्नास्वामी स्टेडियमच्या अनुपलब्धतेमुळे ३० सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आठ संघांच्या स्पर्धे साठी बंगळुरूऐवजी नवी मुंबईची निवड करण्यात आली आहे. नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये पाच सामने होतील, ज्यामध्ये तीन लीग सामने, एक उपांत्य फेरी आणि २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अंतिम सामना याचाही समावेश आहे.

या स्पर्धेच्या तारखा ३० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर याच आहेत. फक्त चिन्नास्वामीवरील सामने नवी मुंबईत हलवले गेले आहे. याशिवाय जी एसीए स्टेडियम (गुवाहाटी), होळकर स्टेडियम (इंदूर), एसीए-व्हीडीसीए स्टेडियम (विशाखापट्टणम) आणि आर. प्रेमदासा स्टेडियम (कोलंबो, श्रीलंका) येथे लढती होणार आहेत.

स्पर्धेचा अंतिम सामना २ नोव्हेंबर रोजी कोलंबो किंवा नवी मुंबईत होईल, पहिला उपांत्य सामना २९ ऑक्टोबर रोजी गुवाहाटी किंवा कोलंबो येथे आणि दुसरा उपांत्य सामना ३० ऑक्टोबर रोजी नवी मुंबईत होईल.

भारतीय संघाचे वेळापत्रक३० सप्टेंबर – वि. श्रीलंका, गुवाहाटी५ ऑक्टोबर – वि. पाकिस्तान, कोलंबो९ ऑक्टोबर – वि. दक्षिण आफ्रिका, विशाखापट्टणम१२ ऑक्टोबर – वि. ऑस्ट्रेलिया, विशाखापट्टणम१९ ऑक्टोबर – वि. इंग्लंड, इंदूर२३ ऑक्टोबर – वि. न्यूझीलंड, नवी मुंबई२६ ऑक्टोबर – वि. बांगलादेश, नवी मुंबईत होणार आहे.




> **अलिकडच्या काही वर्षांत नवी मुंबईतील स्टेडियममध्ये महिला क्रिकेटला चांगला प्रतिसाद मिळाला आहे आणि महिला क्रिकेटसाठी ही चांगली गोष्ट आहे. आंतरराष्ट्रीय सामने आणि महिला प्रीमियर लीग दरम्यान त्याला मिळालेला पाठिंबा उल्लेखनीय आहे, ज्यामुळे खेळाडूंना प्रेरणा देणारे वातावरण निर्माण झाले आहे.**
> **– जय शाह**
> **आयसीसी अध्यक्ष**

# एअर रायफलमध्ये भारताला सुवर्ण

**। शिमकेंट । वृत्तसंस्था ।**

आशियाई नेमबाजी चॅम्पियनशिपमध्ये भारतीय नेमबाजांनी आपली विजयी घोडदौड कायम ठेवली असून पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात अर्जुन बाबुटा, रुद्राक्ष पाटील आणि किरण जाधव यांच्या त्रिकुटाने सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. भारतीय संघाने एकत्रितपणे १,८९२.५ गुणांची कमाई करत चीनच्या संघाला मागे टाकले. वरिष्ठ गटातील या यशाबरोबरच स्पर्धेच्या कनिष्ठ गटातही भारतीय खेळाडूंनी आपला दबदबा कायम ठेवला. कनिष्ठ महिलांच्या स्कीट प्रकारात मानसी रघुवंशीने अंतिम फेरीत ५३ गुणांची नोंद करत सुवर्णपदकाला गवसणी घातली. याच स्पर्धेत भारताच्याच यशस्विनी राठोडने ५२ गुणांसह रौप्यपदक जिंकले. कनिष्ठ पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारातही भारताने 'सुवर्ण' कामगिरी केली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या वैयक्तिक अंतिम लढतीत भारताच्या अभिनव शॉने २५०.४ गुणांसह सुवर्णपदक पटकावले.



# भारतात येणार अर्जेंटिना संघ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

फुटबॉल दिग्गज लिओनेल मेस्सी आणि विश्वविजेता अर्जेंटिना राष्ट्रीय फुटबॉल संघ १० ते १८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान केरळला भेट देणार आहेत. अर्जेंटिना फुटबॉल असोसिएशनने अधिकृतपणे याची पुष्टी केली आहे. मेस्सी आणि त्याचा संघ तिरुवनंतपुरममधील ग्रीनफील्ड स्टेडियममध्ये एक प्रदर्शनीय सामना खेळणार आहेत. हा कार्यक्रम केरळ सरकार आणि रेपोलर ब्रॉडकास्टिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांनी संयुक्तपणे आयोजित केला आहे.



केरळचे क्रीडा मंत्री व्ही. अब्दुरहमान यांनी फेसबुकवर या भेटीची घोषणा करताना म्हटले आहे की, केरळ फुटबॉल चाहत्यांचे अर्जेंटिना संघासाठी असलेले प्रेम आणि पाठिंबा अद्भुत आहे. अर्जेंटिना संघ त्यांच्या चाहत्यांना भेटण्यास उत्सुक आहे. सुरुवातीला दौऱ्याच्या मोठ्या खर्चाबद्दल चिंता होती, परंतु केरळ सरकारने एएफएला आमंत्रित केले. ऑनलाइन चर्चेनंतर, एएफएने फुटबॉल विकास कार्यक्रमांसाठी केरळसोबत सहकार्य करण्यासही रस दाखवला.

मेस्सी आणि अर्जेंटिना यांनी यापूर्वी २०११ मध्ये कोलकाता येथे एक मैत्रीपूर्ण सामना खेळला होता, २०२५ चा दौरा हा १४ वर्षांनंतरचा त्यांचा पहिला भारत दौरा असणार आहे.

ग्रीनफिल्ड स्टेडियमवर होणारा हा प्रदर्शनी सामना अर्जेंटिनासाठी २०२६ च्या विश्वचषकाच्या तयारीसाठी महत्त्वाचा ठरेल. या दौऱ्यामुळे केरळमध्ये फुटबॉलला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे.

एएफएसोबत सहकार्य केल्याने राज्यात तळागाळात फुटबॉल विकास, प्रशिक्षण शिबिरे आणि प्रतिभा शोध यासारखे कार्यक्रम सुरू होऊ शकतात, ज्याचा दीर्घकालीन परिणाम होईल.

# नेमबाजीत एलावेनिल जिंकले सुवर्णपदक




**। शिमकेंट । वृत्तसंस्था ।**


भारतीय नेमबाज एलावेनिल वलारिवानने आपली शानदार कामगिरी सुरू ठेवत शुक्रवारी १६ व्या आशियाई नेमबाजी चॅम्पियनशिपमध्ये महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. अत्यंत चुरशीच्या अंतिम फेरीत तिने चीन आणि कोरियाच्या नेमबाजांना मागे टाकत भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. याशिवाय ऑलिम्पिकपटू मनू भाकरने कांस्यपदक पटकावले. भारताचे स्पर्धेतील हे तिसरे गोल्ड आहे. गुरुवारी भारताला पुरुष गटात दोन सुवर्णपदके मिळाली होती.

तामिळनाडूच्या या २६ वर्षीय खेळाडूने अंतिम फेरीत २५३.६ गुणांची कमाई करत अव्वल स्थान पटकावले. यापूर्वी विश्वचषक आणि विश्व चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदके जिंकणार्या एलावेनिलचे या स्पर्धेतील हे पहिलेच वैयक्तिक पदक आहे. याआधी तिने सांघिक स्पर्धांमध्ये रौप्य आणि कांस्यपदकांची कमाई केली होती. चीनच्या शिनलू पेंगने २५३ गुणांसह रौप्यपदक, तर कोरियाच्या युनजी क्वोनने २३१.२ गुणांसह कांस्यपदकावर समाधान मानले..या स्पर्धेत सहभागी झालेली दुसरी भारतीय खेळाडू मेहुली घोषचे पदक थोडक्यात हुकले. आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत तिने २०८.९ गुणांसह चौथे स्थान मिळवले. विशेष म्हणजे, घोष पात्रता फेरीत ६३०.३ गुणांसह दहाव्या स्थानावर होती. मात्र, तिच्यापेक्षा चांगली कामगिरी करणार्या भारताच्याच दोन नेमबाज, आर्या बोरसे (६३३.२) आणि सोनम मस्कर (६३०.५) या केवळ रँकिंग गुणांसाठी खेळत असल्याने नियमानुसार मेहुलीला अंतिम फेरीत स्थान मिळाले होते. पात्रता फेरीत एलावेनिल ६३०.७ गुणांसह आठव्या स्थानी राहून अंतिम फेरीसाठी पात्र ठरली होती.

# प्रो कबड्डीच्या नियमांत बदल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

येत्या २९ तारखेपासून सुरू होणाऱ्या प्रो कबड्डीच्या बाराव्या हंगामात प्रो-कबड्डीच्या प्रशासनाने नियमांत काही बदल केले आहेत. यातील साखळी सामन्यांतही टायब्रेकरचा अवलंब हा सर्वात महत्त्वाचा बदल समजला जात आहे. त्यामुळे साखळीतील लढतीत आता ड्टायफ सामने होणार नाहीत. प्रो कबड्डीत आणि एकूणच कबड्डी स्पर्धांतील साखळीतील लढतीत टाय (बरोबरीत) होणाऱ्या काही सामन्यांकडे संशयाने पाहिले जात असते.



अखेरच्या चढाईतील हरण्याचा धोका स्वीकारण्यापेक्षा सामना बरोबरीत सोडवून एकेक गुण घेण्याकडे अनेकांचा कल असतो, अशा सामन्यांचे निकाल प्रेक्षकांचा हिरमोड करत असतात. प्रो कबड्डीने यंदाचा मोसम अधिक उत्कंठावर्धक आणि रोमांचकारी करण्यासाठी साखळीतील प्रत्येक सामना निकाली करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे निर्धारित वेळेत सामना बरोबरीत राहिला तर पुढे प्रत्येकी पाच चढायांचा टायब्रेकर घेण्यात येईल. त्यातही निकाल लागला नाही तर सुपर रेड असेल. तरीही बरोबरी झाली तर नव्याने नाणेफेक करून निकाल लावण्यात येईल. यंदाच्या स्पर्धे साठी गुणांकनात आणखी एक निर्णय घेण्यात आला. आतापर्यंत सात किंवा त्यापेक्षा गुणांच्या फरकाने सामना गमावला तर पराभूत संघाला एक गुण मिळायचा. आता तसा गुण मिळणार नाही. जिंकणाऱ्या संघाला दोन तर पराभूत संघाला शून्य गुण असेल. त्यामुळे येथेही तडजोडीची कोणतीही संधी असणार नाही.

प्रत्येकी १८ साखळी सामनेस्पर्धेत १२ संघांमध्ये १०८ लढती होतील; पण प्रत्येक संघाला १८ साखळी सामनेच खेळावे लागतील. गतमोसमापर्यंत प्रत्येकी २२ साखळी सामने खेळावे लागत होते.टायब्रेकरची नियमावली- प्रत्येकी पाच चढायांचा टायब्रेकर- टायब्रेकरसाठी प्रत्येकी सात खेळाडूंचा संघ- पाच चढाईपटूंची नावे अगोदरच सांगावी लागतील- निदान रेषा हीच बोनस गुणासाठीही असणार- बाद झाल्यास रिव्ह्यूची सुविधा नाही- टायब्रेकरही बरोबरीत राहिल्या सुपर रेड.

प्लेऑफसाठी आठव्या क्रमांकापर्यंत संधीएरवी १२ संघ असले तरी प्लेऑफसाठी पहिले सहा संघ पात्र ठरायचे आता आठव्या क्रमांकाचाही संघ प्लेऑफच्या मार्गाने विजेतेपदापर्यंत पोहोचू शकतो. प्लेऑफचे नियम-पाचव्या ते आठव्या क्रमांकावरील संघ प्ले-इन सामन्यांमध्ये लढतील. विजयी संघांना एलिमिनेटरमध्ये स्थान-तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावरील संघ मिनी क्वालिफायर खेळतील. विजयी संघ पुढच्या फेरीत तर पराभूत संघाला प्लेऑफमध्ये आणखी एक संधी- पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावरील संघ क्वलिफायर एकमध्ये लढतील. यातील विजेता संघ थेट अंतिम फेरीत. तर पराभूत संघाला क्वालिफायर दोनमार्फत अंतिम फेरीची संधी मिळणार आहे.

# एरानी-वावासोरी जोडीचेच वर्चस्व

**। न्यू यॉर्क । वृत्तसंस्था ।**

अमेरिकन खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतील मिश्र दुहेरीच्या लढतींचे स्वरूप बदलण्यात आले असले, तरी सारा एरानी आणि आंद्रेया वावासोरीचे वर्चस्व कायम राहिले. एरानी-वावासोरी या इटलीच्या जोडीने सलग चार सामने जिंकताना अमेरिकन स्पर्धेतील जेतेपद राखले.



एकेरीतील आघाडीच्या खेळाडूंना आकर्षित करण्यासाठी यंदा अमेरिकन स्पर्धेतील मिश्र दुहेरीच्या लढती नव्या रूपात खेळविण्यात आल्या. स्पर्धेचा कार्यक्रम कमी करून ३२ वरून थेट १६ जोड्यांनाच खेळविण्यात आले. हा बदल टीकेचे लक्ष्य ठरला, तरी यामुळे एकेरीतील बहुतेक प्रमुख खेळाडूंचा स्पर्धेत सहभाग राहिला. नोव्हाक जोकोविच, कार्लोस अल्कराझ, इगा श्वीऑटेक असे नामांकित खेळाडू यात खेळले आणि त्यांचा खेळ पाहण्यासाठी प्रेक्षकांनीही मोठी गर्दी केली. मात्र, एकेरीतील तारांकितांच्या गर्दीतही एरानी-वावासोरी या दुहेरीतील विशेषज्ञ जोडीनेच बाजी मारली. यासह त्यांनी १० लाख डॉलरचे पारितोषिकही आपल्या नावे केले.

अंतिम लढतीत एरानी-वावासोरी जोडीने तिसऱ्या मानांकित इगा श्वीऑटेक आणि कॅस्पर रूट जोडीचा ६-३, ५-७ (१०-६) असा पराभव केला.

त्याआधी, उपांत्य फेरीच्या पहिल्या लढतीत एरानी-वावासोरी जोडीने अमेरिकेच्या डॅनिएले कॉलिन्स आणि ख्रिस्टियन हॅरिसन जोडीवर ४-२, ४-२ अशी मात केली होती. अन्य लढतीत श्वीऑटेक-रूड जोडीने जेसिका पेगुला आणि जॅक ड्रॅपर जोडीचा ३-५, ५-३ (१०-८) असा पराभव केला होता.

**निर्णय देशांतर्गत वनडे क्रिकेट स्पर्धांसाठी | काही खेळाडूंना राष्ट्रीय संघात मिळणार संधी**

# देशांतर्गत क्रिकेटमध्ये बदल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बीसीसीआयने गेल्या काही वर्षात देशांतर्गत क्रिकेट रुपडं पालटले आहे. त्यामुळे देशांतर्गत क्रिकेटला पुन्हा वैभव प्राप्त झाले आहे. दिग्गज खेळाडू देखील स्पर्धांमध्ये भाग घेत आहे. असं असताना देशांतर्गत क्रिकेटमध्ये एक महत्त्वाचा बदल बीसीसीआयने केला आहे. हा निर्णय देशांतर्गत वनडे क्रिकेट स्पर्धांसाठी असणार आहे. बीसीसीआय वनडे क्रिकेटचा फॉर्मेट बदलणार आहे. आता देशांतर्गत वनडे स्पर्धेत तुम्हाला प्लेट ग्रुप सिस्टम पाहायला मिळेल. या नव्या पर्वापासून हा बदल लागू होणार आहे.



नियमाची सुरुवात दुलीप ट्रॉफी स्पर्धे पासून होणार आहे. दुलीप ट्रॉफी स्पर्धा २८ ऑगस्टपासून सुरु होणार आहे. पहिला सामना नॉर्थ झोन विरुद्ध ईस्ट झोन, दुसरा सामना सेंट्रल झोन आणि नॉर्थ ईस्ट झोनमध्ये होईल.

विजय हजारे ट्रॉफी असो की वरिष्ठ महिला एकदिवसीय स्पर्धा, अंडर २३ पुरुष राज्य ए ट्रॉफी वनडे स्पर्धा असो.. या स्पर्धेतील सर्व चार संघ चार एलिट आणि एक प्लेट गटात विभागले जातील. तळातील सहा संघ प्लेट गटात असतील. यापूर्वी प्रत्येक पर्वात प्लेट गटातील दोन संघ वर जायचे. तर दोन संघ खाली यायचे. त्यानंतर एक संघाला वर किंवा खाली जायचा. या बदलाच्या माध्यमातून देशांतर्गत क्रिकेट आणखी भक्कम करण्याचा हेतू बीसीसीआयचा आहे. यामुळे प्रत्येक संघाची पारख होईल. तसेच चांगल्या खेळाडूंची निवड करणे सोपे होईल.

भारतीय संघ २०२६ या वर्षात काही महत्त्वाचे वनडे सामने खेळणार आहे. या निर्णयामुळे काही खेळाडूंनी रामिळू शकते. या आधी बीसीसीआयने रणजी स्पर्धेत एलीट आणि प्लेट ग्रुप फॉर्मेटमध्ये सामने खेळवण्याचा निर्णय घेतला होता.

रणजी ट्रॉफी २०२५-२०२६ स्पर्धा याच फॉर्मेटमध्ये खेळली जाईल. या स्पर्धेची सुरुवात ऑक्टोबरपासून होणार आहे. दरम्यान, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी आणि वरिष्ठ महिला टी२० स्पर्धेतही बीसीसीआयने बदल केला आहे. येथे बाद फेरीऐवजीसुपरलीगस्टेजआणण्याचानिर्णय घेतला आहे.

> ### बाद फेरीऐवजी सुपर लीग
> **या निर्णयामुळे काही खेळाडूंनी राष्ट्रीय संघात खेळण्याची संधी मिळू शकते.या आधी बीसीसीआयने रणजी स्पर्धेत एलीट आणि प्लेट ग्रुप फॉर्मेटमध्ये सामने खेळवण्याचा निर्णय घेतला होता. रणजी ट्रॉफी २०२५-२०२६ स्पर्धा याच फॉर्मेटमध्ये खेळली जाईल. या स्पर्धेची सुरुवात ऑक्टोबरपासून होणार आहे. दरम्यान, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी आणि वरिष्ठ महिला टी२० स्पर्धेतही बीसीसीआयने बदल केला आहे. येथे बाद फेरीऐवजी सुपर लीग स्टेज आणण्याचा निर्णय घेतला आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)